आला आला पाऊस आला..
रेनकोट / 2 in1 जर्किन
लहान मुलांपासून सर्वांसाठी
Branded Zeel/Boss/Only One Complete Range
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505



संस्थापक के. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. ०७.०७.२०२५ | अंक नं. ८४ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

Elite banquet
A.C. बॅन्क्वेट हॉल
अहिल्यानगर मध्ये पहिल्यांदा ए.सी. बॅन्क्वेट हॉल,
भव्य हॉल व प्रशस्त पार्किंग
* वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस
* शुभकार्य, साखरपुडा
* डोहाळे जेवण, मुंज
* नामकरण समारंभ
* कॉर्पोरेट इव्हेंट्स
व इ. कार्यक्रमासाठी उपलब्ध
हॉटेल संकेत
टिळक रोड, स्वतिक चौक, स्टेशन रोड, अहिल्यानगर
9422222020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉइंट | पॉइंट्सवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
5gm सोन्याच्या सुवर्णखरेदीवर
स्क्रॅचकार्डव्दारे जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स व सोबतच हमखास मजुरीवर भरघोस डिस्काऊंटही..
चलो दुबई
सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर + 15%* पर्यंत सूट
Conditions Apply*

# नगरच्या भूमिअभिलेख कार्यालयात सुरु आहे प्रचंड 'अनागोंदी कारभार'

## पैसे भरुन २ -३ वर्ष उलटले तरी शेतकऱ्यांच्या मोजण्या होईनात, सर्रास सुरु आहे 'अर्थपूर्ण' व्यवहार

नगर - नगर तालुक्यासाठी असलेल्या भूमी अभिलेख कार्यालयात गेल्या अनेक दिवसांपासून प्रचंड अनागोंदी कारभार सुरु आहे. बऱ्याच शेतकरी बांधवांनी मोजणी शुल्क भरुन २-३ वर्षे उलटली तरी त्यांच्या मोजण्या झालेल्या नाहीत. तर दुसरीकडे अर्थपूर्ण व्यवहार करणाऱ्यांना व्हीआयपी ट्रीटमेंट दिली जात असून त्यांची मोजणी किंवा पोट हिस्सा मात्र त्वरित पूर्ण करून दिला जात आहे. त्यामुळे शेतकरी वर्गात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

भूमी अभिलेख कार्यालयाचे अनेक प्रताप समोर येवू लागले आहेत. शासकीय दराने नियमानुसार शुल्क भरलेल्या शेतकऱ्यांची मोजणी २-३ वर्ष रखडविली जात आहे. तर दुसरी कडे मात्र मोठ्या व वशिला असलेल्या व्यक्तींनी मात्र साधी मोजणी भरुनही अतितातडी पेक्षा जलद मोजणी केल्याचे उदहारण आहेत. काही धन दांडग्या, पैसेवाल्या लोकांची मोजणी पोट हिस्सा अर्थ पूर्ण व्यवहारने पूर्ण केले जात आहेत. बऱ्याच ठिकाणी पूर्वी त्याच कार्यालयाने दिलेल्या हद्दी खुणा जाणून बुजुन चुकीच्या दाखविल्या आहेत.

### शेतकऱ्यांचे चक्क 'व्हीआयपी'मोबाईल नंबर दाखविले

नगर तालुक्यातील एका गावात एका मोठ्या धनदांडग्याचे मोजणी शीट पूर्ण करतांना त्या गटाची मोजणी अपूर्ण असतांना त्या पैसेवाल्याचे पोट हिस्सा मात्र त्वरित पूर्ण करुन दिला, त्या शेतकऱ्याने या पूर्वीही मोजणी शुल्क भरलेले असतानाही (पुढील मजकूर पान २ वर)

आपला माणुस, आपला चहा...
रत्नकमल चहा
ब्रँडेड कंपनीचा चहा व रत्नकमल चहा एक वेळेस जरूर तुलना करून पहा
आशिष ट्रेडर्स चहा पावडरचे होक व किरकोळ विक्रेते
रत्नकमल, बुरुड गल्ली, मारुती मंदिरासमोर, अहिल्यानगर- ४१४००१
Contact : 8767369367

# महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या वीज दराच्या पुनरावलोकन आदेशाचे फायद्यापेक्षा तोटेच जास्त

## २५ जूनचा आदेश तत्काळ रद्द करण्याची ऑल इंडिया रिन्यूएबल एनर्जी असोसिएशनची मागणी

नगर - महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या (एमईआरसी) २५ जून २०२५ च्या वीज दर पुनरावलोकन आदेशामुळे महाराष्ट्राच्या औद्योगिक भविष्यास मोठा धोका निर्माण होण्याची शक्यता असून या विरोधात तात्काळ कारवाई आवश्यक असून हा आदेश रद्द करण्यात यावा अशी मागणी ऑल इंडिया रिन्यूएबल एनर्जी असोसिएशनने केली आहे.

याबाबत माहिती देताना संघटनेचे जिल्हाध्यक्ष अमित काळे म्हणाले की, महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने २५ जून २०२५ रोजी दिलेल्या दर पुनरावलोकन आदेशामुळे निर्माण झालेल्या गंभीर आणि दिशाभूल करणाऱ्या वीज दरवाढीबद्दल तीव्र चिंता आणि नाराजी व्यक्त करतो. हा निर्णय राज्यातील उद्योगधंद्यांना पंगू करणारा, नवीकरणीय ऊर्जा क्षेत्राला मारक ठरणारा आणि एकूण व्यावसायिक वातावरण बिघडवणारा आहे.

मुख्यमंत्री यांच्यासह सर्वसामान्य जनतेला नवीन वीज दररचनेमुळे वीजबिलांमध्ये १० टक्के घट होईल, असे भासवण्यात आले. मुख्यमंत्र्यांच्या ट्विटमधूनही हीच भावना दिसून आली. मात्र वास्तव अगदी भिन्न आहे. जुलै २०२५ पासून मिळणारी वीज बिले मार्च २०२५ च्या तुलनेत अत्यंत वाढलेली असतील, आणि ही वाढ पारदर्शक सल्लामसलत न करता लादलेल्या बदलांमुळे झाली आहे.

### जनसहभाग दुर्लक्षित, प्रक्रिया त्रुटीपूर्ण

एमईआरसी ने १ फेब्रुवारी २०२५ रोजी महावितरणच्या बहुवर्षीय दर प्रस्तावावर हरकती मागविल्या. त्यावर इतका प्रतिसाद मिळाला की आयोगाची वेबसाईटच क्रॅश झाली. राज्यभरातील सुनावणीमध्ये महावितरणच्या प्रस्तावातील अनेक त्रुटी स्पष्ट झाल्या होत्या. यानंतर २८ मार्च २०२५ रोजी एमईआरसी ने एक संतुलित आदेश दिला. मात्र महावितरणने तत्काळ गणिती चुका असल्याचे सांगून स्थगिती मागितली आणि पुन्हा सुधारित प्रस्ताव सादर केला. एमईआरसी ने या प्रस्तावाची माहितीही जनतेला दिली नाही. त्यावर सुनावणीही घेतली नाही, आणि २५ जून २०२५ रोजी एकतर्फी आदेश दिला, जो पारदर्शकतेच्या आणि लोकशाही प्रक्रियेच्या विरोधात आहे.

### औद्योगिक क्षेत्रावर जबरदस्त आघात

या नव्या दररचनेमुळे खालील प्रमुख कारणांनी वीजबिलांमध्ये मोठी वाढ झाली आहे, त्यामध्ये केवीएएच पद्धतीवर बिलिंग, वीज दर आणि स्थीर आकार / मागणी शुल्कात वाढ, टाईम ऑफ डे दर (टीओडी) मध्ये मोठे बदल, सोलर बँकिंग सुविधा हटविणे, इंधन समायोजन शुल्क शून्य गृहित धरणे, आणि मागील सवलती व सूट रद्द करणे. याचा परिणाम ३ शिफ्ट चालवणारे लघुउद्योग २५-३० टक्के वाढ, एक शिफ्टचे लघुउद्योग: २०-४० टक्के वाढ, सौर (नेट मीटरिंग) वापरणारे ३०-३५ टक्के वाढ, मोठ्या आणि कार्यक्षम युनिट्स ८-१२ टक्के वाढ, यामुळे केवळ नफ्यात घट होणार नाही, तर अनेक युनिट्सना उत्पादन बंद करावे लागेल, कामगार कपात होईल किंवा उद्योग इतर राज्यांत स्थलांतरित होतील.

### सौर ऊर्जा क्षेत्राला जबरदस्त फटका

रात्रकालीन वापरासाठीची सौर बँकिंग हटवण्यात आली असून, आता सौर निर्मितीच्या एकूण युनिट्सवर बिल आकारले जात आहेत. त्यामुळे सौर प्रकल्प पूर्णतः अलाभकारक झाले आहेत. राज्याच्या धोरणानुसार सौर प्रकल्प उभारलेले अनेक उद्योग आज फसवणुकीच्या स्थितीत आहेत. शिवाय, पर्याय म्हणून ग्रीन एनर्जी मार्गातही परवानग्या आणि प्रक्रियेमध्ये अनावश्यक विलंब होत आहेत.

### नियामक आयोगाकडून विश्वासाला तडा

एमईआरसी कडून अपेक्षित असलेली पारदर्शकता आणि स्वायत्तता या प्रकरणात पूर्णतः हरवली आहे. २८ मार्चचा आदेश मागे घेऊन, कोणतीही जनसुनावणी न घेता दिलेला २५ जूनचा निर्णय नियामक स्वातंत्र्य, पारदर्शकता आणि वैध प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण करतो. हा निर्णय कोळसा लॉबी आणि वितरण कंपन्यांच्या फायद्यासाठी असून, उद्योग व व्यवसाय क्षेत्रांच्या मुळावर घाव घालणारा आहे.

### राज्य सरकारकडे संघटनेच्या मागण्या

एमईआरसी चा २५ जून २०२५ चा आदेश तात्काळ रद्द करावा. २८ मार्च २०२५ चा आदेश पुन्हस्थापित करावा, एमईआरसी मध्ये लोकप्रतिनिधी व क्षेत्रीय प्रतिनिधींची नियुक्ती करून पारदर्शक प्रक्रिया निश्चित करावी, सौर ऊर्जेसाठी बँकिंग व नेट मीटरिंग सुविधा पुन्हा लागू कराव्यात, ओपन ॲक्सेस प्रक्रियेला सोपे व जलद करावे. हे केवळ दरवाढीचे नव्हे, महाराष्ट्राच्या औद्योगिक भविष्याचे प्रकरण आहे. जर हे वेळीच रोखले गेले नाही तर उद्योगांचे स्थलांतर आणि बेरोजगारी वाढेल, सौर ऊर्जा स्वीकार थांबेल, राज्याची आर्थिक स्पर्धात्मकता घटेल, गुंतवणूकदारांचा विश्वास उध्वस्त होईल, म्हणूनच तात्काळ दुरुस्तीची आणि हस्तक्षेपाची आवश्यकता आहे. महाराष्ट्राचे समृद्धी, रोजगार आणि ऊर्जा स्वावलंबन हे यावरच अवलंबून आहे, असे संघटनेचे म्हणणे आहे.



स्व.राजेंद्र भास्करराव वालकर
स्व.दि. ०७ जुलै २०१३
|| १२ वे पुण्यस्मरण ||
आठवण तुमची प्रत्येक क्षणाला, व्याकुळ करते आमच्या मनाला..
आज जरी नाही तुम्ही आमच्यात,
सदैव राहतील तुमच्या आठवणी आमच्या मनात..
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली..
- दुःखांकित -
आर. बी. वालकर
वालकर, कायगांवकर, वाफगांवकर, देवळालीकर परिवार
अहमदनगर, राजगुरुनगर

वॉटर ओव्हरफ्लो अलार्म लावा
पाणी आणि वीज दोन्ही वाचवा!
सांऊड अलर्ट (हिंदी/इंग्रजी)
चालू/बंद करण्यासाठी सूचक
पाण्याची व विजेची बचत होते
दोन पिन प्लग असलेली एक-मीटर केबल
फक्त ₹500/- मध्ये
Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd, Near Gajanan Hospital, Ahilyanagar
9145008009 / 9822542011
ABHAY SALES CORPORATION & HARDWARE

CERTIFICATE COURSE IN ADVANCE ACCOUNTING
COURSE DETAILS
COMPUTER APPLICATION
ADVANCE ACCOUNTING
TAXATION, BANKING
AUDITING
100% JOB ASSISTANCE
Experience Faculties | 1 Lac + Students Trained | Job Assistance
CAA IS NOT JUST A COURSE BUT A GREAT INVESTMENT IN YOUR CAREER
DiSHA COMPUTER INSTITUTE An ISO 9001:2015 Certified
Delhi Gate Branch 9371051769
Old ST stand Branch 9371151769
Pipeline Branch 7447761769

SONI Since 1965 TILES
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel.: (0241) 2418720 Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

बाळ आजारी आहे का?
ते वारंवार आजारी असणे | नेहमी सर्दी, खोकला
वारंवार होणारा बाल दमा | वारंवार जुलाब होणे
प्रतिकारशक्ती कमी असणे | वजन, उंची कमी
या तक्रारींवर खात्रीशीर सामाजिक जाणिवेतून मोफत सल्ला व शिबिर
*सर्व आजारांसाठी ॲडमिट सुविधा उपलब्ध.
*सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
संपर्क : मो. ९५११११०४४४
डॉ.अनिरुद्ध गिते MBBS / MD paeds
अक्षय मुलांचे हॉस्पिटल बालिकाश्रम रोड, अ.नगर

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# शहरातील अवजड व अवैध प्रवासी वाहतूक पोलिसांनी तातडीने बंद करावी अन्यथा 'ठिय्या आंदोलन' करणार

नगर – अहिल्यानगर शहरातील अवैध प्रवासी वाहतूक व अवजड वाहतुकीमुळे मोठ्या प्रमाणात वाहतुक कोंडी होत असून अवजड वाहनांमुळे अपघात होवून निष्पाप नागरिकांचा बळी जात आहे. ही अवजड वाहतूक तात्काळ बंद करावी तसेच बेशिस्तपणे अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अन्यथा वाहतूक शाखेच्या कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्यात येईल असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने देण्यात आला आहे.

याबाबत शहर विभागाचे पोलिस उपअधीक्षक अमोल भारती यांची शिष्टमंडळाने भेट घेवून निवेदन दिले. यामध्ये म्हंटले आहे की, अहिल्यानगर शहरातील राज्य महामार्ग व राष्ट्रीय महामार्ग तसेच बाजारपेठ रस्त्यांवर कायम अवैध प्रवासी वाहतुक व अवजड वाहतुक करणारे हे कधीही सुस्थितीत वाहने चालवत नाही. रात्रीच्या सुमारास सिग्नल बंद असल्याने सर्रासपणे भरधाव वेगात वाहतुक करतात. तसेच काही अवजड वाहनांतील चालक हे मद्य प्राशन करुन वाहतुक करतात. या अवजड वाहनांची वर्दळ वाढली असून त्यामुळे अपघाताचे प्रमाण खुप वाढले आहे.

सदर वाहनांमुळे नागरीकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच शहरात सध्या विविध रस्त्यांची कामे पूर्ण झाली असून काही कामे प्रगतीपथावर आहेत. परंतु ज्या रस्त्यांची कामे अपूर्ण आहेत त्या ठिकाणाहुन अशी वाहने राजरोसपणे वाहतुक करतात. तसेच काही दिवसापूर्वी रात्री ११च्या सुमारास जड वाहतुकीमुळे सौ. सुरेखा गुरुलींगअप्पा होनराव यांचा दुर्दैवी मृत्यु झालेला आहे. बाह्यवळण रस्ता पुर्णपणे कार्यान्वित झालेला असून त्याचा वापर केला जात नाही. त्यामुळे अवजड वाहतुक ही शहरांतर्गत रस्त्याने होत आहे. वारंवार वाहतुक शाखा तसेच प्रशासनाला सुचना देऊन देखील कुठल्याच प्रकारच्या उपाययोजना जड वाहतुकीबाबत होत नाही. त्यामुळे निष्पाप लोकांचा जीव जात आहे.


शहरातील अवैध प्रवासी वाहतूक व अवजड वाहतूक बंद करावी या मागणीचे निवेदन शहर विभागाचे पोलिस उपअधीक्षक अमोल भारती यांना देताना राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी.

तरी अहिल्यानगर शहरातील अवैध प्रवासी वाहतुक व अवजड वाहतुकीमुळे होणारी वाहतुक कोंडी बंद न केल्यास राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सर्व पदाधिकारी हे शहर वाहतुक शाखेच्या दालनात ठिय्या आंदोलन करतील याची नोंद पोलिस प्रशासनाने घ्यावी. असा इशारा देण्यात आला आहे. यावेळी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष वैभव ढाकणे, सुरेश बनसोडे, प्रा. माणिकराव विधाते, सागर गुंजाळ, सिद्धार्थ आढाव, अंकुश मोहिते यांच्या सह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## प्रेरणादायी अक्षरधन...

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१



### अवकाशात जाणारा पहिला भारतीय – शुभांशू शुक्ला

नुकतेच नासा ऑक्सिमय मिशन – ४ अंतर्गत भारतीय आंतराळवीर शुभांशू शुक्ला आंतरराष्ट्रीय स्पेस स्टेशनवर जाणारा पहिला भारतीय ठरला आहे. त्याचे अवकाशभर अभिनंदन.

शुभांशू हा इस्त्रो व भारतीय हवाईदलाचा प्रतिनिधी म्हणून आयएसएसवर जाणारा पहिला भारतीय आहे. त्याच्या आधी आतराळात गेलेले राकेश शर्मा सल्युत – ७ स्टेशनवर गेले होते,. ऑक्सिओम स्पेस व स्पेस एक्सच्या खासगी व्यावसायिक मोहिमेअंतर्गत उड्डाण करणारा तो पहिला भारतीय ठरला आहे.

वर्ष २००० साली त्याच्या घरचा फोन वाजला त्यावर शुभांशूच्या मित्रांनी एनडीएत निवड झाल्याबद्दल त्याचे अभिनंदन म्हणून सांगितले तेव्हा त्याच्या वडिलांना कळाले की तो एनडीएचा फॉर्म भरुन भारतीय सैन्यात जाऊ इच्छित आहे. खरं तर मुलानं आयएएस व्हावे असे त्याच्या वडिलांना वाटत होते. यार एका मुलाखतीत त्याचे वडील म्हणाले की तो कधीही आपल्या योजना सांगत नाही. या अवकाश मोहिमेत निवड झाल्यानंतरही त्याने घरी ४ दिवसांनी सांगितले.

त्याच्या मतोश्री म्हणाल्या की, शुभांशू लहानपणापासूनच खूप मेहनती आहे. घरी जे शिजवले जाई तो ते खात असे अन् जे काही मिळे त्यात तो समाधानी असे, (विद्यार्थी मित्रांनो ही गोष्ट लक्षात ठेवा बरं...)

बालपणापासून तो हनुमान भक्त असून अजूनही तो मारुतीरायाची पूजा करतो., (आणि त्यांच्याप्रमाणे अंतराळात उड्डाण करीत आहे.)

एवढे असूनही तो स्वत:ला अज्ञेयवादी समजतो. म्हणजे मानवी ज्ञानाला मर्यादा असतात. सर्व काही कळू शकत नाही यावर त्याचा विशवास आहे. ही गोष्ट आपण सर्वांनी लक्षात ठेवली पाहिजे.

शुभांशुला आकाशगंगा ताऱ्यांची छायाचित्रे काढायला आवडते व जनमकुंडली, भविष्य सांगायला आवडते. एका वाक्यात सांगायचे तर अध्यात्मिक विज्ञान व भौतिक ज्ञानाचा अनोखा संगम त्याच्या वक्तीमत्त्वात असून हा आदर्श नक्कीच अनुकरणीय ठरू शकतो.

# नगरच्या भूमिअभिलेख कार्यालयात सुरु आहे प्रचंड 'अनागोंदी कारभार'

(पान १ वरुन)

मोजणी केली नव्हती, त्या बद्दल त्या शेतकऱ्याने तक्रार करत मोजणी पूर्ण करु नये असा अर्ज ३० जुलै २०२४ रोजी दिला तरीही मोजणी शीट मोठा अर्थ व्यवहार करुन दिले गेले. त्या शेतकऱ्याचे आजूबाजूचे शेतकऱ्यांचे मयत असलेल्यांचे नाव टाकण्यात आली तसेच संबंधित शेतकऱ्यांचे फोन नंबर व गावचे नाव जाणून बुजुन चुकीचे टाकण्यात आले आहे. आजूबाजूच्या शेतकऱ्यांचे मोबाईल नंबर अगदी व्ही आय पी टाकलेले आहेत. उदा आनंदा कार्ले हया मयत शेतकऱ्याचा ९७९८७७७७७७ तर गायकवाड याचा ९९९९७९९९९ असा टाकून तो खंडाळा गावच्या हद्दीत असताना बाबुर्डी घुमट असा पत्ता टाकण्यात आला. एकाचा शेतकऱ्याचा मोबाईल नंबर ९९९९९९९७७७ असा टाकण्यात आला आहे.

नगर तालुक्यातील खंडाळा येथील गट नं १७० ची मोजणी करण्यासाठी १ मार्च २०२१ रोजी पैसे भरलेले आहेत. मात्र अद्याप मोजणी केली नाही. तसेच २७ जून २०२४ रोजी गट नं ९२ साठी अती तातडी पैसे भरुनही अद्याप मोजणी नाही. तसेच अरणगाव येथील गटाची मोजणी करण्यासाठी २७ मार्च २०२२ रोजी २७ हजार शुल्क भरूनही मोजणी केली गेली नाही. एकंदरीत अतिशय भोंगळ कारभाराचे हे एक नव्हे अनेक प्रकार आहेत.

### भूमिअभिलेख कार्यालयाला कुलूप ठोकणार : शिवसेना

शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांकडे गावोगावच्या अनेक शेतकऱ्यांनी अशा प्रकारच्या तक्रारी केलेल्या आहेत. याबाबत भूमिअभिलेख कार्यालयाने तातडीने कारभारात सुधारणा केली नाही तर शिवसेना स्टाईलने त्यांना धडा शिकविण्याचा इशारा माजी जिल्हा परीषद सदस्य संदेश कार्ले यांनी निवेदनाद्वारे दिला आहे. तसेच तालुक्यातील ज्या शेतकरी बांधवांनी मोजणी शुल्क भरले परंतु अद्याप मोजणी झालेली नाही, कुणाची फायनल केली नाही, तसेच कुणाच्या काही या भूमि अभिलेख कार्यालया बद्दल इतर तक्रार असल्यास त्यानी संदेश कार्ले (मो. ९४२२२२०८४३), रामदास भोर (मो.९४२१४३८६९९) यावर संपर्क साधून माहिती द्यावी. तसेच भूमिअभिलेख कार्यालयाने या निवेदनाची दखल न घेतल्यास शेतकऱ्यांसह भूमिअभिलेख कार्यालयास कुलुप लावणार असल्याचा इशारा संदेश कार्ले, रामदास भोर विलास शेडाळे व गणेश वायसे यांनी दिला आहे.

# सैनिकांच्या प्रलंबित कामांना पोलीस ठाण्यात प्राधान्य द्या

## पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांचे सर्व अधिकाऱ्यांना आदेश

नगर – सैनिक सुरक्षा पंधरवड्याच्या निमित्ताने जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी एक निर्णय घेऊन, आजी माजी सैनिक, अर्धसैनिक, वीरपत्नी, वीरमाता व वीरपित्यांच्या प्रश्नांवर तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्याला बजावले.



जिल्ह्यातील सैनिकांच्या प्रश्नांचे निवेदन पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांना देताना महाराष्ट्र त्रिदल कोर कमिटीचे अध्यक्ष अशोक चौधरी, मारुती ताकपेरे, लहू सुलाखे, निवृत्ती आंग्रे, आप्पासाहेब पिंगळे व नारायण पालवे आदी.

दैनंदिन धावपळीत उपेक्षित राहिलेल्या सैनिक बांधवांना पोलीस ठाण्यात ताटकळत ठेवणे हा अन्यायच आहे असे ठाम मत मांडत, यापुढे जिल्ह्यातील ३२ पोलीस ठाण्यांमध्ये सैनिकांचे सर्व प्रलंबित प्रश्न तत्काळ मार्गी लावावे, अशी लेखी अधिसूचना काढण्याचे आदेश पोलीस अधीक्षक यांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत. आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधित कर्मचाऱ्यावर शासकीय कारवाई करण्यात येईल असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

सैनिक शिक्षक अशोक चौधरी यांनी सैनिकांना दिल्या जाणाऱ्या वागणुकीबाबतची तक्रार करताच, एसपींनी तत्काळ संबंधित डीवायएसपी व ठाणेप्रमुखांना फोन करुन आवश्यक ती कारवाई करण्याचे निर्देश दिले. जयहिंद माजी सैनिक बहुउद्देशीय सेवाभावी संस्था (म.रा) चे अध्यक्ष मेजर निळकंठ उल्हारे यांनी हा निर्णय सकारात्मक असून, जिल्ह्यातील कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी हा एक महत्त्वाचा टप्पा असल्याचे सांगितले. त्यांनी पोलीस अधीक्षकांच्या निर्णयाचे स्वागत केले. या वेळी महाराष्ट्र त्रिदल कोर कमिटीचे अध्यक्ष अशोक चौधरी, मारुती ताकपेरे, लहू सुलाखे, निवृत्ती आंग्रे, आप्पासाहेब पिंगळे व नारायण पालवे आदी उपस्थित होते.

### बाजीराव तांबडे यांचे अल्प आजाराने निधन

नगर – केडगाव येथील रहिवासी बाजीराव साहेबराव तांबडे (वय ७५) यांचे पुणे येथे उपचारा दरम्यान निधन झाले. त्यांच्यावर केडगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, ३ मुले, १ मुलगी, ३ भाऊ, सुना, नातवंडे, परतवंडे असा परिवार आहे. पत्रकार मुरलीधर तांबडे यांचे ते वडील होत. भारतीय खाद्य निगम (FCI) मधुन ते सेवानिवृत्त झाले होते.



### रसिकलाल बोकरिया यांचे अल्प आजाराने निधन

नगर – अंबिकानगर केडगाव येथील रहिवासी रसिकलाल घेवरचंद बोकरिया (वय ७८) यांचे ६ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पत्नी, ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. तुषार, मयुर, मधूर यांचे ते वडील होत. पन्नालाल, नंदलाल, प्रदीप बोकरिया यांचे ते बंधू होत.

### सौ. चंद्रकलाताई पाटील (अनभुले) यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – गुलमोहोर रोड सावेडी येथील सौ. चंद्रकलाताई साहेबराव पाटील (अनभुले) (वय ७९) यांचे ५ जुलै रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. साहेबराव कृष्णाजी पाटील (अनभुले) यांच्या त्या पत्नी तर प्रा. वसंत पाटील यांच्या मातोश्री होत. त्यांच्यामागे पती, १ मुलगा, २ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे.




### सिंधुबाई कोकणे यांचे अल्प आजाराने निधन

श्रीरामपूर – टाकळीभान श्रीरामपूर येथील रहिवासी सिंधुबाई सावळेराम कोकणे (वय ७७) यांचे ६ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर टाकळीभान श्रीरामपूर अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, २ मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. पांडुरंग, विश्वास कोकणे, कावेरी ढोकणे, सुनीता घोगरे यांच्या त्या मातोश्री होत.



### शामराव सांगळे यांचे वृद्धापकाळाने निधन

श्रीरामपूर – येथील सेवानिवृत्त तहसिलदार शामराव लक्ष्मणराव सांगळे (वय ८७) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर विकास सांगळे व संजय सांगळे यांचे वडील, अशोक कारखान्याचे स्टोअरकीपर ज्ञानेश्वर सांगळे, प्रमोद व विलास सांगळे यांचे चुलते, चि.व्यंकटेश सांगळे यांचे आजोबा होत.



# भंडारदरा पाठोपाठ निळवंडे धरणातूनही प्रवरा नदीत विसर्ग सुरु

## टप्पाटप्प्याने विसर्ग वाढण्याची शक्यता, नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

नगर – भंडारदरा धरण तसेच ओझर बंधाऱ्यातून सोडलेल्या विसर्गापाठोपाठ आता निळवंडे (उर्ध्व प्रवरा) धरणातूनही ७ जुलै रोजी सकाळी ९ वाजता ६५७० क्युसेक्स पाण्याचा विसर्ग प्रवरा नदीपात्रात सोडण्यात आला आहे. तो दुपारी १२ वाजता वाढवून ९६१० क्युसेक करण्यात आला आहे. पावसाचे प्रमाण लक्षात घेता पुढील काही तासांत विसर्ग टप्याटप्याने वाढण्याची शक्यता असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाण्यामुळे प्रवरा नदीपात्रात पाणीपातळी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे नदीकाठच्या अकोले, संगमनेर, ओझर बंधाऱ्याखालील गावांसह राहाता, राहुरी, श्रीरामपूर आणि नेवासा तालुक्यातील सर्व नदीकाठच्या गावांना व वस्त्यांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. नदीपात्रात ठेवलेले जनावरं व तत्सम साहित्य तात्काळ सुरक्षित ठिकाणी हलविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

नागरिकांनी सतर्क राहावे, नदीपात्रात उतरणे अथवा उशिरा हालचाल टाळावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. तसेच संबंधित तालुक्यांतील प्रशासकीय यंत्रणांनी योग्य ती खबरदारी घेण्याचे निर्देश देण्यात आले असल्याचे कार्यकारी अभियंता प्रदीप हापसे (उर्ध्व प्रवरा धरण विभाग, संगमनेर) यांनी सांगितले. पावसाच्या परिस्थितीवर लक्ष ठेवून धरणातील विसर्गात बदल होऊ शकतो, त्यामुळे नागरिकांनी प्रशासनाशी संपर्कात राहून दक्षता बाळगावी, असेही आवाहन करण्यात आले आहे.

## जायकवाडीत पाणीसाठा वाढल्याने नगर, नाशिकला दिलासा

नगर व नाशिक जिल्ह्यांतून गोदावरी नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर पाणी सोडले जात असल्याने जायकवाडी धरणांत ३६ दिवसांत १६ टीएमसी नवीन पाणी पोहोचले. या धरणात उपयुक्त जलसाठा ६५ टक्के झाल्यास नगर व नाशिकच्या धरणांमधून पाणी सोडण्याची आवश्यकता नाही. यंदा जुलैच्या पहिल्या आठवड्यातच जायकवाडीचा उपयुक्त साठा ३८.४२ टीएमसीवर पोहोचला. सद्यस्थितीत नांदूर मधमेश्वर येथून गोदावरी नदीत ३९१३२ क्युसेक वेगाने विसर्ग सुरू आहे. आता निळवंडेतूनही पाणी सोडण्यात आले आहे. त्यामुळे यंदा जायकवाडी लवकर भरण्याची शक्यता अभ्यासकांनी व्यक्त केली.

मेंढेगिरी अहवालातील शिफारशींनुसार जायकवाडी धरणातील खरीप वापरासह जिवंत पाणीसाठा १५ ऑक्टोबरला ६५ टक्क्यांपेक्षा कमी असेल तर नगर, नाशिक भागातील धरणसमुहातील पाणी सोडावे लागते. मागील वर्षी धरण पूर्ण क्षमतेने भरल्यामुळे पाणी सोडण्याची गरज भासली नाही. यंदा नगर व नाशिक पाणलोट क्षेत्रात दमदार पाऊस सुरू आहे. त्याचबरोबर मे महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे नवीन पाण्याची आवक झाली. अहिल्यानगर जिल्ह्यातील भंडारदरा धरणातून निळवंडेच्या दिशेने पाण्याचा विसर्ग सुरू आहे. आता निळवंडेतूनही विसर्ग सुरु झाला असल्याने जायकवाडीचा जलसाठा ५०.५७ टक्क्यांवर पोहोचला आहे. त्यापैकी धरणात सद्यस्थितीत उपयुक्त जलसाठा ३८.७६ टीएमसी आहे. उपयुक्त साठा साठा ६५ टक्के म्हणजेच ५० टीएमसीवर पोहोचल्यास समन्यायी धोरणानुसार पाणी सोडण्याची गरज भासणार नाही.

### मनोज तरटे याचे अकस्मात निधन



नगर – केडगाव मोहिनीनगर येथील रहिवासी मनोज सुभाष तरटे (वय २४) याचे ६ जुलै रोजी निधन झाले. याप्रकरणी कोतवाली पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली आहे.

तरटे याच्यावर केडगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे आई, १ भाऊ, २ बहिणी, मेहुणे असा परिवार आहे. संजय प्रल्हाद तरटे यांचे ते बंधू होत.

# पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर ९ जुलैपासून आझाद मैदान, मुंबई येथे 'बेमुदत उपोषण' आंदोलन

## अहिल्यानगर जिल्हा परिषद परिचर संघटना होणार सहभागी

नगर – विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर ९ जुलै पासून आझाद मैदान, मुंबई येथे होणाऱ्या 'बेमुदत उपोषण' आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद परिचर कर्मचारी संघटनेचे राज्याध्यक्ष मुकुंद तुरे यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाकडे जिल्हा परिषदेच्या परिचर कर्मचाऱ्यांचा विविध प्रश्नांची सोडवणूक व्हावी यासाठी मागील एक वर्षांपासून भाऊसाहेब पठाण (अध्यक्ष, राज्य सरकारी गट–ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, मुंबई.) यांच्या नेतृत्वात निवेदनाद्वारे पाठपुरावा सुरू आहे, ग्रामविकास विभागाने १३ जून २०२४ रोजी निर्गमित केलेले आरोग्य सेवक पदाचे सेवाप्रवेश नियमाचे प्रारूपामध्ये जिल्हा परिषदेमधील पूर्वीपासुन सेवेत असलेल्या माध्यमिक शालांत परिक्षा(१० वी) उत्तीर्ण परिचर गट–ड कर्मचाऱ्यांना आरोग्य सेवक पदावर २५ टक्के पदे ही पदोन्नतीसाठी राखीव ठेवण्यात आली आहेत. तथापि, सदर सेवाप्रवेश नियमांचे प्रारूपास गेल्या वर्षापासून अंतिम मान्यता मिळण्याचे प्रलंबित आहे. त्यामुळे जिल्हा परिषदांमधील वर्ग–४ कर्मचा–यांच्या आरोग्य सेवक पदावर होणाऱ्या पदोन्नत्या नाहक रखडलेल्या आहेत. त्याकरिता सदर प्रारूपास अंतिम मान्यता तात्काळ मिळावी, अशी महत्वाची मागणी आहे. तरी महाराष्ट्रातील सर्वच जिल्हा परिषदांमध्ये परिचर वर्ग–४ पदांवरुन आरोग्यसेवक वर्ग–३ पदांवर पदोन्नती करिता २५ टक्के पदे मिळविणे, तसेच परिचर वर्ग–४ पदांवरुन कनिष्ठ सहाय्यक वर्ग–३ पदांवरील ४०:५०:१० या प्रामाणातील पदोन्नती कोटा पुर्ण होईपर्यंत पदोन्नती प्रक्रिया निरंतर राबविणे, जिल्हा परिषदेच्या आरोग्य व पशुसवंर्धन विभागांतील रिक्त पदे तात्काळ सरळसेवेने भरती प्रक्रिया राबविणे, राज्य शासनांच्या चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या बरोबरीने जिल्हा परिषदेच्या परिचर कर्मचाऱ्यांना २५० रूपये धुलाई भत्ता होणे, जिल्हा परिषदेच्या परिचर कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नतीचा पहिला लाभ एस–३ (१६६००–५२४००) ऐवजी एस–६ (१९९००–६३२००) होणेसाठी तसेच कनिष्ठ सहाय्यक लिपीक पदांप्रमाणेच कनिष्ठ सहाय्यक लेखा या पदांवर देखील पदोन्नती / सरळसेवा / वाहनचालकांतून नामनिर्देशनाने हे प्रमाण ४०:५०:१० या व इतर मागण्या पदरांत पाडून घेण्यासाठी जिल्हा परिषदेच्या परिचर कर्मचाऱ्यांनी भाऊसाहेब पठाण (अध्यक्ष, राज्य सरकारी गट–ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, मुंबई.) यांच्या नेतृत्वाखाली आझाद मैदान, मुंबई येथे ९ जुलै पासून होत असलेल्या 'बेमुदत उपोषण' आंदोलनात सहभाग नोंदवावा असे आवाहन मुकुंद तुरे यांनी केले आहे.

या आंदोलनात जिल्हा शाखा अहिल्यानगर संघटना सक्रिय सहभागी होणार आहे, असे राज्य उपाध्यक्ष सागर आगरकर, राज्य कार्याध्यक्ष अशोक काळापहाड, राज्य संघटक सुरेश भोजणे, जिल्हाध्यक्ष निलेश गाडेकर, जिल्हा सचिव अनुप गायकवाड, कार्याध्यक्ष ऋषिकेश बनकर, अनिल येनगुल, अनघा कुलकर्णी, भारती जाधव, श्रीकांत ढगे, रविंद्र रोकडे, हैबत भांगरे, सिद्धार्थ कदम, प्रकाश धोत्रे, निलेश गोरे, हनुमंत लाकुडझोडे, दादा बरबडे, इंद्रभान गावडे, कमलेश धावणे, सूरेश माळवदे, किरण खेडकर, विजय घुले, सुरेखा भांड, अनिता साठे, संध्या फसले, ज्ञानदेव कदम, विजय वाबळे, निवृत्ती काळे यांनी कळविले आहे.

## सर्व प्रकारच्या विकारग्रस्तांसाठी ८ जुलैपासून योग संजीवन वर्ग

नगर – योग विद्या धाम अहिल्यानगरच्या वतीने सर्व विकारग्रस्तांसाठी परिणामकारक व उपयुक्त असा योग संजीवन वर्ग ८ जुलै पासून सुरू होत आहे. अशी माहिती कार्याध्यक्ष सुभाष पांढरे यांनी दिली.

हे वर्ग सावेडी येथील येग भवन येथे सकाळी ७ ते ८ व दुपारी ४ ते ५ या वेळेत घेतले जाणार आहेत. विकार कोणताही असो सर्व प्रकारच्या विकारांवर या वर्गातल्या प्रक्रिया अत्यंत लाभदायक ठरतात आणि या अभ्यासातील आसने सर्वांनाच जमतात असा अनुभव आहे.

विशेषतः वृद्धांना, ज्यांना असे वाटते की आपल्याला काहीच जमणार नाही, त्यांना देखील ही आसने करता येतील. त्यामुळे प्रौढ, वृद्ध व अतिवृद्ध यांनी देखील याचा लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष डॉक्टर सुंदर गोरे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी फोन नं. ०२४१२४२१२५५ वर संपर्क साधावा.

## ३१ जुलैपर्यंत योग शिक्षक पदविका प्रवेश वर्ग

नगर – यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाद्वारे घेण्यात येणार्या योग शिक्षक पदविका (झ१२६) अभ्यास क्रमाची २०२५–२६ या वर्षाकरिता प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आली असून ३१ जैलु पर्यंत प्रवेश घेता येतील, असे अभ्यासक्रमाचे समन्वयक प्राचार्य अडाणे यांनी सांगितले.

सदर अभ्यासक्रमास युजीसी मान्यता असल्यामुळे ज्या साधकास योगामध्ये आपले करियर करावयाचे आहे, त्यांना या परीक्षेचा भरपूर फायदा होईल. फक्त रविवारी वर्ग असल्याने तुमचा सध्याचा अभ्यासक्रम चालू ठेवून हा डिप्लोमा पूर्ण करता येईल.

या अभ्यासक्रमास योग विद्या गुरुकुल नाशिक अंतर्गत योग महाविद्यालयात नाशिक यांना मान्यता मिळाली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर आपला प्रवेश निश्चित करण्यासाठी ९४०५०००६८०, ९८२३७८१२४६, ७३८७४४२२८८ या क्रमांकावर संपर्क करावा.

# गृहिणी

## आरोग्य

### चहा जरुर प्या पण...

दिवसभर काम करून थकलो तरी आपण स्वतःला उत्साही वाटण्यासाठी चहाचा एक घोट घेतो. काही लोकांचा दिवस चहाशिवाय सुरू होत नाही. काही लोक दिवसाच्या सुरुवातीला चहा घेतात. पण सकाळी काहीही न खाता चहा पिणे चांगले मानले जात नाही. यामुळे पोटाच्या आतील थरावर आम्लाचा प्रभाव वाढतो, ज्यामुळे आम्लपित्त होते. जर तुम्हाला सकाळी चहा प्यायला आवडत असेल, तर नाश्त्यानंतर अर्धा तासाने चहा घ्या किंवा चहापूर्वी मूठभर मखाना किंवा काही सुकामेवा खा. जर तुम्हाला चहा पिल्यानंतर आम्लपित्त होण्याची तक्रार असेल, तर तुम्ही खूप जास्त चहा घेत असाल. जेव्हा तुम्ही वारंवार चहा पिता तेव्हा आम्लपित्ताची समस्या उद्भवू शकते. म्हणून दिवसातून एक किंवा दोन कपपेक्षा जास्त चहा घेऊ नका. तसेच रात्री उशिरा चहा पिणे टाळा.

## पाककला

### मशरुम पनीर पिझ्झा

**साहित्य :** २०० ग्रॅम पनीर, ६/७ मशरूम, १ कप सिमला मिरची, ३/४ कप मोठ्ठा टोमॅटो, १ कप कांदा, ३/४ कप गाजर, ३/४ कप कोबी, १ टेबलस्पून ऑरीगानो, १ टेबलस्पून चिलीफ्लेक्स, चिली सॉस, ८ पिझ्झा बेस, २०० ग्रॅम मोझारोला चीज, पिझ्झा टॉपींग, टोमॅटो केचप,

**कृती :** सव भाज्या चिरून घ्या. आधी भाजी करुन घेऊयात. कढईत १ टेबलस्पून बटर घाला नी त्यात सर्व भाज्या घालून परतून घ्या. ओरीगानो, चिलीफ्लेक्स मीठ घाला भाजी थोडी कोरडी करा. पीझ्झा बेस घ्या नी तव्यावर टॉपींग ठेवणार ती बाजू थोडी शेकून घ्या. आता त्यावर पीझ्झा सॉस लावा नंतर भाजी घाला नी वरती पनीर तुकडे घाला. थोडा चिली सॉस घाला, वर चीज किसून घाला. आता पिझ्झा तव्यावर ठेवा नी वरती कढई झाका मंद आचेवर १० मिनीटे होऊ द्या. मशरूम पनीर पिझ्झा तयार आहे. कट करा नी सॉस बरोबर खायला द्या.

## वास्तू

* एकादशीच्या दिवशी तांदूळ खाणे खाणे निषिद्ध मानले जाते. त्याच बरोबर दिवाळी, शरद पौर्णिमा, शीतलाष्टमी, नागपंचमी आणि कोणाच्या मृत्यूच्या दिवशी घरात पोळी बनवली जात नाही. हा नियम पाळला नाही तर आई अन्नपूर्णा रागावते. अशा लोकांना अन्न आणि पैशाची कमतरता भासू लागते.

* पोळी बनवताना काही वास्तु नियम ही लक्षात ठेवले पाहिजेत. तुम्ही ज्या स्टोव्हवर अन्न शिजवता तो तुमच्या स्वयंपाकघराच्या आग्नेय कोपऱ्यात असावा. पोळी बनवताना तुमचे तोंड पूर्वेकडे असावे.

* पहिली पोळी नेहमी गायीला द्यावी. जर तुम्ही गायीला खाऊ घालू शकत नसाल तर तुम्ही पहिली पोळी किंवा भाकरी कुत्र्याला खायला देऊ शकता. गाय किंवा कुत्र्याने पोळी खाल्लयाने त्या घरात राहणाऱ्या लोकांच्या सर्व समस्या दूर होतात.

## सल्ला

* माश्या पुदिना आणि तुळशीच्या सुगंधाने पळून जातात. घरात तुळस किंवा पुदिन्याचे रोप ठेवा किंवा त्यांचे तेल फवारणी करा.

* दररोज सकाळी किंवा संध्याकाळी काही वेळ कापूर जाळणे. त्याचा वास केवळ माश्याच नाही तर डासांनाही दूर करतो.

## सौंदर्य

मीठाच्या पाण्याने चेहरा धुणे हा एक नैसर्गिक आणि सोपा मार्ग आहे जो त्वचेचे आरोग्य सुधारू शकतो. मीठात दाहक-विरोधी आणि जीवाणूरोधी गुणधर्म असतात जे त्वचेच्या समस्या कमी करण्यास मदत करू शकतात. मीठाच्या पाण्याने चेहरा धुतल्याने मुरुमांच्या समस्या कमी होतात आणि त्वचेचे आरोग्य सुधारते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. ८ जुलै २०२५

**भौमप्रदोष, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, आषाढ शुक्लपक्ष, ज्येष्ठा २७।१५, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ३८ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** शत्रुपक्ष हावी राहील. एखाद्या चुकीला पुन्हा करु नका. मार्ग प्रशस्त होईल. अडकलेली कामे पूर्ण झाल्याने आनंद वाटेल.

**वृषभ :** आरोग्यात सुधारणा. आर्थिक स्थितीत बचत आणि निवेशाचे योग येतील. लाभदायी करार होतील.

**मिथुन :** आर्थिक आणि सामाजिक कामांमध्ये अडथळे. कामांची गती मंदावेल. शांत रहा. लाभदायक बातमी कळेल.

**कर्क :** संपत्तीच्या कामात यश मिळण्याचे योग. मनात नवीन कल्पना सुचतील. आपल्या महत्वाकांक्षेमुळे यश मिळू शकेल.

**सिंह :** आपली स्थिति, वास्तविकता वाढेल. पारिवारिकदृष्ट्या वेळ सामान्य. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**कन्या :** उत्साह, आत्मविश्वास वाढेल. अडकलेला पैसा मिळेल. खासगी कामाकडे जास्त लक्ष द्याल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. अध्ययनात छान यश.

**तूळ :** अडकलेला पैसा मिळेल. अस्तिक लोकांसाठी शुभ. गैरसमज दूर होतील. व्यर्थ ताण जाणवेल. जबाबदारीची कामे पडतील.

**वृश्चिक :** आपल्या कामांची समाजात चर्चा होईल. आपल्या बुद्धि आणि तर्काने कार्यात यशाची शक्यता.

**धनु :** आपल्या प्रयत्नाने उन्नति कराल. धनलाभ होईल. वरिष्ठांची मर्जी राहील. वाहने व यंत्रे जपून चालवावीत.

**मकर :** पाठबळ मिळेल. मनाला प्रसन्नता वाटेल. वैवाहिक जीवनात सुख मिळेल. मित्रांकडून आर्थिक लाभ होईल.

**कुंभ :** आपली दूरदृष्टि आणि बुद्धिने अडकलेली कामे पूर्ण होतील. सामाजिक यश. नवीन कार्य सुरू करू नका.

**मीन :** काळजीपूर्वक काम करा. कोणतेही काम एखाद्यावर विसंबून राहून करु नका. आरोग्य नरम-गरम राहील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२१५ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ■ | ४ | ५ | |
| ६ | | ■ | ७ | | | | ■ |
| | ■ | ८ | | ■ | ९ | | १० |
| ११ | १२ | | | ■ | ■ | ■ | |
| १३ | | | ■ | ■ | १४ | १५ | |
| | ■ | ■ | १६ | १७ | | | ■ |
| १८ | १९ | | | | ■ | ■ | २० |
| २१ | | ■ | २२ | | | | |

**आडवे शब्द :-** १) एकाएकी; अकस्मात; आकस्मिक ४) रत्नाकर; मकरालय; समुद्र ६) हलणारे; विनाशी ७) भीडभाड न ठेवता बोलणारा; स्पष्टवक्ता ८) कुस्तीगीर; पहिलवान ९) मुस्लीम पुरुषाचे एक नाव ११) दारावर बोटे आपटून केला जाणारा आवाज १३) घोटाळा; गोंधळ (कामातला वगैरे) १४) भयंकर १६) घोड्याचे ओरडणे १८) टाळ्यांचा आवाज २१) उपहास; फजिती; हुर्यो २२) एकेक बाब घेऊन

**उभे शब्द :-** १) अश्लील २) चालण्याची ढब; वर्तन; वागणूक ३) अगदी गरीब; निर्धन ४) ओढा वगैरेवर बांधलेला तात्पुरता पूल ५) गळणारा ८) एक प्रकारचा जुगार १०) कागदावर किंवा वाळूवर रेघा मारून शकुन पाहण्याची विद्या १२) केस; खडी १४) तीव्र उठणारी वेदना; चावी; सणक १५) एक मराठी आडनाव १६) मोठे भगदाड १७) कोणत्याही ऋतूतील हवामान सहन करू शकेल अशा शरीरयष्टीचा १९) भय; भीती २०) अयोग्य; अव्यावहारिक

### शब्दगंध क्र. ७२१४ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| म | धु | मे | ह | ■ | कं | गा | ल |
| हा | ■ | हु | र | ळा | स | ■ | ट |
| न | म | न | ■ | द | ■ | क | प |
| ■ | वा | त | ■ | ला | गा | स | ट |
| गा | ळ | ■ | मे | ■ | र | ब | ■ |
| ल | ■ | सु | ■ | पो | स | ■ | वि |
| कं | ग | वा | ■ | ग | ■ | त | मा |
| स | र | स | ■ | ल | मा | प | न |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** वेळ कुणासाठीही थांबत नाही त्यामुळे वेळ खर्च करताना तो व्यक्ती त्यासाठी योग्य आहे का याचा नेहमी विचार करा.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### हिऱ्याला व्यवहारात एवढे महत्त्व का प्राप्त झाले?

माणसाला हिऱ्याबद्दल फार पूर्वीपासूनच आकर्षण वाटत आले आहे. अगदी मानवी संस्कृतीच्या सुरुवातीपासून हिरा मौल्यवान मानला जातो. तसेच तो अतिशय कठीण असतो हेही आपल्याला पूर्वीपासून ठाऊक होते. पूर्वी फक्त राजे-रजवाडे व अतिशय धनाढ्य माणसेच हिरे वापरत. रत्नांच्या व खड्यांच्या मानाने हिरे खूपच दुर्मीळ होते. त्याचबरोबर ते पैलू पाडल्यावर अतिशय आकर्षक दिसायचे. त्यातच हिऱ्याला पैलू पाडणे हे महाकठीण आणि तितकेच नाजूक काम ! कठीणपणामुळे हिरा अक्षरशः हजारो वर्षे न झिजता राहू शकतो. त्याच्या तेजावरही वयाचा परिणाम होत नाही की, त्यावर चरेही पडत नाहीत.

अर्थात पैलू पाडेपर्यंत हिरा इतका सुंदर दिसेलच असे नाही. गारगोटी व हिरा यांच्यातला फरक कळायला तज्ज्ञ माणसाचीच आवश्यकता असते. तसेच पैलू पाडण्यासाठीही तज्ज्ञ माणसाची गरज असते.

हिऱ्याची किंमत, त्याचा आकार, वजन, पैलू आणि रंग यांवर ठरते. हिरा पांढरा, तांबूस निळसर किंवा पिवळी छटा असलेला असू शकतो. काळे व कमी प्रतीचे हिरे औद्योगिक हिरे म्हणून वापरले जातात. आजकाल औद्योगिक हिरे कृत्रिमरीत्याही निर्माण करता येतात. भारतात सुरत शहरात नि आसपासच्या भागात हिऱ्यांना पैलू पाडण्याचा मोठा व्यवसाय असून दरवर्षी या व्यवहारात ६० कोटी रुपयांची उलाढाल होते. भारतीय कारागीर हिऱ्याला पैलू पाडण्यात वाकबगार म्हणून जगभर प्रसिद्ध आहेत. भारतात पन्ना इथे, आणि वज्रकरूर या ठिकाणी हिरे सापडतात.

### राक्षसाची भिती

माझ्या पाठीवर चढला. पण आता पर्याय नव्हता. लगाम आधीच त्याच्या तोंडात होता. चोराच्या हातात चाबूक होता. चाबूक त्याला लागताच तो पळून गेला. काही अंतर गेल्यावर, चोराने घोड्याला थांबवण्यासाठी लगाम ओढला, पण घोडा धावत राहिला. कमी होण्याऐवजी त्याचा वेग वाढतच गेला. मग, चोराला संशय आला की हा घोडा नाही तर घोड्याच्या रूपातील राक्षस आहे, जो मला मारू इच्छितो. तो असा विचार करत असतानाच, वडाच्या झाडाची एक फांदी त्याच्या समोर आली. घोडा त्याखाली गेला. चोराला घोड्यापासून पळून जाण्याचा मार्ग सापडला आणि त्याने दोन्ही हातांनी फांदी पकडली. घोडा खाली गेला, चोर झाडाच्या फांदीवर लटकून वाचला. घोड्यासारख्या राक्षसाचा एक मित्र माकड त्याच झाडावर राहत होता. त्याने घाबरून पळून जाणाऱ्या घोड्यासारख्या राक्षसाला बोलावले आणि म्हणाला- मित्रा! तू का घाबरतोस? हा राक्षस नाही तर एक सामान्य माणूस आहे. तुला हवे असेल तर तू त्याला खाऊ शकतोस.

चोर माकडावर खूप रागावला. माकड त्याच्यापासून दूर एका उंच फांदीवर बसला होता. पण त्याची लांब शेपटी चोराच्या चेहऱ्यासमोर लटकत होती. रागाच्या भरात चोराने त्याची शेपटी दातांनी दाबून चावू लागला. माकडाला खूप वेदना होत होत्या पण तो त्याच्या मित्र राक्षसाला चोराची ताकद दाखवण्यासाठी तिथेच बसून राहिला. तरीही त्याच्या चेहऱ्यावर वेदनेची छाया स्पष्ट दिसत होती. त्याला पाहून राक्षस म्हणाला - मित्रा! तू काहीही बोललास तरी तुझा चेहरा सांगत आहे की तू एका भयानक राक्षसाच्या तावडीत सापडला आहेस. असे म्हणत तो पळून गेला.

तात्पर्य : कोणत्याही गोष्टीची शहानिशा केल्याशिवाय त्यावर विश्वास ठेऊ नये. (पूर्ण)



## जीवन का अमृत (भाग १)

भजन-सिमरन के बाद हम कभी भी अस्वस्थ महसूस नहीं करते । मीठी याद का और सही तरीके से की गई साधना का असर तो इसके विपरीत होता है; हम शांति और आनंद महसूस करते हैं। हमारे पास जो समय है, वह बेशकीमती है। ऐसा न हो कि हम इसको व्यर्थ गवाँ कर पछताएँ। बेहतर तो यह होगा कि हम इसका अधिक से अधिक सदुपयोग करें। ऐसे व्यक्ति को आंतरिक सहायता उसी प्रकार मिलती है, जिस प्रकार आग की सहायता के लिए आक्सीजन आती है।

मुझे खुशी है कि आप औरों की सहायता कर रहें हैं, ताकि वे सत्गुरुओं के रास्ते पर चल सकें। हम नियमित रुप से भजन सिमरन करके और अपने दैनिक आचरण पर कड़ी नज़र रख के, अपनी कम जोरियों पर, विजय पा सकते हैं। आंतरिक शक्ति से

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

हर प्रकार की सहायता मिलती है। जो आध्यात्मिक उन्नति पाने के पक्के इरादे पर डटे रहते हैं, वे अवश्य ही सहायता पाते हैं और समय आने पर अपने लक्ष्य पर पहुँचते हैं। सत्संगों में सत्गुरु की दया भरपूर होती है और कभी-कभी गर्म और सूखे मौसम में भी बारिश होने लगती है, जो कि महान सत्गुरु हज़ूर बाबा सावनसिंह जी के आशीर्वादों को दर्शाती है।

मुझे आपकी सेहत के बारे में जानकर दुःख हुआ। आपको सलाह दी जाती है कि आप किसी योग्य चिकित्सक से मिलें या कुछ प्राकृतिक किस्म की कसरतें करें, जैसे तेज चलना, नियमित रूप से हल्की-फुल्की कसरत, नियमित समय पर और कम मात्रा में भोजन । जहाँ तक कुंडलिनी का सवाल है, आप इस ओर कोई ध्यान नहीं दें, क्योंकि इसमें बहुत खतरा हैं। आपको एक प्राकृतिक रास्ता बता दिया गया है १

जब सत्गुरु के प्रति प्रेम सभी हदों को पार कर जाता है तो भक्त महसूस करता है कि जैसे वह सत्गुरु से एकमेक हो । तब सत्गुरु उसके द्वारा काम करता प्रतीत होता है और वह सत्गुरु में। क्या सेंट पॉल ने नहीं कहा, यह मैं हूँ, अब मैं नहीं, बल्कि क्राईस्ट मुझ में रहता है। ऐसी अवस्था भजन-सिमरन में सहायता करती है।

शिष्य को पाँच सिद्ध नामों का जाप हर प्रकार के खतरों से बचने के लिए दिया जाता है। यह सभी आध्यात्मिक मंडलों में प्रवेश के लिए संकेत शब्द का काम करता है, मुसीबत के समय मन और शरीर को शक्ति देता है तथा आत्मा को सत्गुरु के नज़दीक लाता । यह एकाग्रता को बढ़ाने का साधन है तथा कई और प्रकार की शक्तियाँ प्रदान करता है। एक सच्चे सत्गुरु द्वारा दिए गए पाँच सिद्ध नाम चार्ज से भरपूर होते हैं ।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

ईर्ष्या के विचारों से ऐसी बदबू पैदा होती है जैसे कोई मिर्ची जल रही हो। जिसे आम भाषा में कहते हैं किसी का दिल जल रहा है। जिस व्यक्ति का दिल जलता है उस व्यक्ति को देखते ही अपना मुंह फेर लेते हैं। वहां से भागने को मन करता है। ईर्ष्यालू व्यक्ति सदा निन्दा ही करेगा।

आलस्य से ऐसी तरंगे निकलती हैं जो उसे उदासीन कर देती हैं। किसी भी काम करने को मन नहीं करेगा। हमेशा कहेगा कल करूंगा। उस की तरंगे ऐसी होती हैं कि कोई भी व्यक्ति उसे पसंद नहीं करता सब उस से कन्नी काटने लगते हैं। कोई उसे काम नहीं देता ।

हरेक व्यक्ति को पसीना आता है। जिस व्यक्ति को नाकारात्मक विचार ज्यादा आते हैं उनके पसीने वा कपडो से बहुत गंदी बदबू आती है। श्रेष्ट योगियों के विचार शुद्ध होते हैं उनसे चंदन जैसी खुशबू आती है।

### आज्ञा चक्र

कोई भी हीनता, कोई भी इच्छा पुरी न होने की कसक, धोखे, बेवफाई, पश्चाताप, शारीरिक व मानसिक दुःख, योग न लगने का दुःख, गरीबी का दुख, दुर्व्यवहार का दुख, सम्मान न मिलने का दुख, अनपढ़ होने का दुख, या कोई भी सूक्ष्म में जरा सा भी बुरा महसूस करते हैं तो ये सब नाकारात्मक विचार हैं। जैसे ही नाकारात्मक विचार आते हैं हमारे से बदबू निकलती है। यह ऐसी बदबू है जो नष्ट नहीं होती और पूरे वातावरण में फैल जाती है और जो भी सामने आयेगा प्रभावित होगा। अपने चाहे दूसरे के कारण ज्यों ही सकारात्मक विचार का बीज पैदा हो उसे तुरंत सकारात्मक विचार से बदल दो। जब भी नाकारात्मकता आये तुरंत मन को विश्व सेवा में लगा दो । किसी दूसरी आत्मा को मन से स्नेह वा शांति की तरंगे दो । जिस व्यक्ति से नाकारात्मकता आ रही है उसके पीछे कल्पना में किसी स्नेही आत्मा को देखो और मन ही मन उसे कहो आप स्नेही हो स्नेही हो। आप के यह विचार विरोधी को बदलेगें और आप को भी सकून मिलेगा।

आज्ञा चक्र -३०-मन-

विचार की आकृति/रेखा

हम जो विचार मन में करते हैं वह किसी न किसी आकृति का रुप धारण कर लेता है। एक बार एक महिला अपने बच्चे के लिये रो रही थी जो कि मर चुका था। उस महिला का करीलियन कैमरे से फोटो लिया गया तो उस में उसके बच्चे का फोटो आ गया जिस के लिये वह रो रही थी। एक प्रेमिका अपने प्रेमी की याद में तड़फ रही

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**नवरा :** अगं, माझा गुंता झालाय ग! या योगासनाची पुढची स्टेप काय आहे, बघ लवकर

**बायको :** युट्युब वर 'उद्या भेटू' म्हणुन योगी महाराज निघुन गेले!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* भारताने वर्ल्ड हॉकी विजेतेपद कधी मिळविले?

- १९७५

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

बुद्धिमत्ता वाढविण्यासाठी पंचेंद्रियांचा विकास, सद्गुणांची संगत, अध्यात्मिक संस्कार, बालकाचा आहार-विहार, आई-वडिलांचे प्रेम, माया, आपुलकीपूर्ण नाते या सर्वच गोष्टींना महत्त्व द्यायला हवे.

आनुवंशिकतेने प्राप्त झालेल्या बुद्धिमत्तेचा पुरेपूर वापर करून त्यांना नवीन ज्ञानाच्या वाटा उपलब्ध करून दिल्या आणि त्याचबरोबर सतत प्रोत्साहन दिले गेले, तर मुलांना त्यांच्या बुद्धिमत्तेच्या सर्वोच्च क्षमतेपर्यंत पोहोचविणे आपल्याला सहज शक्य होते. फक्त हे सर्व करताना त्यांची क्षमता लक्षात घेणे गरजेचे आहे. उगीचच दुसऱ्या मुलाशी तुलना करून आपल्या बाळाचे नुकसान करू नये. त्याच्या कलाकलाने घेऊन आनंदाने कोणतीही बळजबरी न करता आपण मुलांचा बौद्धिक विकास करू शकतो.

खरेतर विकास ही निरंतर प्रक्रिया असून, ती अगदी गर्भावस्थेपासून सुरू होऊन तारुण्यावस्थेपर्यंत सुरू असते. बालकाची शारीरिक वाढ व विकास एकमेकांवर अवलंबून असतो.

### बौद्धिक विकास कसा करावा?

प्रत्येक बालकाचा बौद्धिक विकास हा स्वतंत्रपणे होत असतो. जन्मानंतर शोध आणि ज्ञान ग्रहण करण्याची इच्छा याद्वारेच बौद्धिक विकास होतो. ज्या वातावरणात मुले वाढतात, त्या वातावरणाचाही मुलांच्या बौद्धिक विकासावर परिणाम होतो. पालकांनी मुलांना शिकण्यासाठी नेहमी प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. मिळालेले प्रोत्साहन व शिकण्याची संधी याद्वारे मुलांचा सर्वोत्तम बौद्धिक विकास साधता येतो. म्हणून पालकांनी मुलांना सदैव प्रेरित करावे. मुलांच्या बौद्धिक विकासासाठी त्याची शारीरिक वाढही उत्तम होणे गरजेचे आहे. न शारीरिक वाढीबरोबरच मानसिक विकास होत असतो. फास्टफूड टाळून हिरव्या पालेभाज्या, सुकामेवा, मोड आलेली कडधान्ये, दूध, दुधाचे पदार्थ यांचा वापर आहारात करण्यास प्रत्येक आई-वडिलांनी प्राधान्य द्यावे व मुलांना असा आहार घेण्यासाठी प्रोत्साहित करावे. मुलाची बुद्धी कुशाग्र होण्यासाठी त्यांच्या मेंदूला कायम खाद्य पुरवायला हवे. बुद्धीला चालना मिळेल असे शब्दकोडे, बुद्धिबळ, सापशिडी यासारखे बौद्धिक क्षमता वाढविणारे खेळ खेळण्यास उद्युक्त करावे.

अनुवंशिकतेने बालकाला आई-वडिलांकडून काही गुणवैशिष्ट्ये मिळतात, तर काही गुण सभोवतालच्या वातावरणातून आलेल्या अनुभवांमुळे मिळतात. उदा. एकाच घरात जन्मलेल्या दोन्ही मुलांची बौद्धिक क्षमता, स्वभाव हे वेगवेगळे असतात. उदा. दुर्वा आणि अंकुर हे एकाच घरात जन्मलेले सख्खे बहीण-भाऊ. या दोघांचेही स्वभाव, बौद्धिक क्षमता व आवडी-निवडा या वेगवेगळ्या आहेत.

या सर्व गोष्टींबरोबरच आई-वडिलांच्या प्रयत्नाने व आयुर्वेदिक औषधोपचाराने बाळाची बौद्धिक क्षमता वाढण्यास मदत होते.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# चंदुकाका ज्वेल्स् सावेडी येथे चलो दुबई स्किमचे आयोजन

नगर – मागील वर्षांच्या आपल्या उदंड प्रतिसादामुळे सावेडी स्थित चंदुकाका ज्वेल्स्ने यंदाही ग्राहकांसाठी चलो दुबई या स्किमचे आयोजन केले आहे. या योजनेअंतर्गत ५ ग्रॅम सोन्याच्या दागिन्यांच्या खरेदीवर स्क्रॅच कार्ड मिळणार असून त्याव्दारे दुबई ट्रिप किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स मिळणार आहे. त्याचबरोबरच शोरूमने रू. २०००० च्या चांदीखरेदी किंवा रू. ५००० च्या फॉर्मिंग ज्वेलरी खरेदी किंवा रू. ५००० च्या कोणत्याही भिशी योजनेत सहभागी व्हा आणि स्क्रॅचकार्डव्दारे दुबई ट्रिप किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स मिळव्याची संधी ग्राहकांना दिली आहे. याव्दारे चंदुकाका ज्वेल्सने सुवर्णग्राहकांबरोबरच, चांदीखरेदी, फॉर्मिंग ज्वेलरी असो की भिशी प्रत्येक ग्राहकांना या योजनेत सामिल होण्याची व दुबई ट्रिप जिंकण्याची सुसंधी दिली आहे. असे चंदुकाका ज्वेल्सच्या व्यवस्थापकांनी दिली आहे.

चलो दुबई | चंदुकाका ज्वेल्स सोनेरी नातं..

खरेदी ही नेहमीच फायद्याची ठरावी व प्रत्येकाला एक भेटवस्तू मिळावी या हेतूने सदर स्किमचे आयोजन करण्यात आले आहे. याचाच अर्थ सुवर्णखरेदी, चांदीखरेदी, फॉर्मिंग ज्वेलरी खरेदी किंवा भिशी योजनेत सहभागी झाल्यास हमखास गिफ्ट हे मिळणारच आहे. शिवाय दुबई ट्रिप जिंकण्याची संधीही.

ग्राहकांसाठी विविध डिझाईन्समध्ये बकुळीहार, राणीहार, शाहीहार, नेकलेस, ठुशी, ताशीवमाळ, पाटल्या, बांगड्या, टॉप्स तसेच टेम्पल ज्वेलरी मध्ये बिंदी, बाजुबंद, टॉप्स्, झुमका, काप, नेकलेस, अंगठी, चोकर, पाटल्या, बांगड्या, ब्रासलेट, पदक व गंठणची भव्य श्रृंखला.. हजर स्टॉकमध्ये उपलब्ध आहे. वाजवी दर, वाजवी मजुरी हे आमच्या सुवर्णदालनाचे विशेष वैशिष्ट्ये आहे.

खास चांदीमधील ताट, वाटी, चमचा, फुलपात्र, पुजा सेट अशी विविध प्रकारची, वेगवेगळ्या वजनाची चांदीची भांडी येथे उपलब्ध आहेत. रक्षाबंधनानिमित्त खास सोन्या-चांदीच्या राख्या आकर्षक पॅकिंगमध्ये व वेगवेगळ्या वजनात मोठे कलेक्शन आपल्यासाठी सादर केले आहेत.

प्रत्येक ग्राहकाला सोने खरेदीवर काहीतरी गिफ्ट मिळायला हवे या उद्देशाने सदर स्किमचे आयोजन करण्यात आले आहे. सुवर्णसमृध्दी योजनेव्दारे मोठी सुवर्णखरेदी करता येणे शक्य होणार आहे. येथील सुवर्णखरेदी केलेल्या दागिन्यांची मोडतेवेळी कोणत्याही प्रकारची घट धरली जात नाही हे चंदुकाका ज्वेल्स्चे विशेष वैशिष्ट्ये. या स्किममुळे ग्राहकांना भरघोस बक्षिसे जिंकण्याची संधी मिळणार आहे.

चंदुकाका ज्वेल्स्, सावेडी येथील सुवर्णदालनातून खरेदी करा व बक्षिसे जिंका असे आवाहन संचालकांनी केले आहे.




## बी.सी.एफ.आय. संस्थेच्या वतीने मोहरमनिमित्त सरबत वाटप

बज्म ए चिरागे फकीर चिश्ती इंटरनॅशनल (बी.सी.एफ.आय.) संस्थेच्या वतीने मोहरमनिमित्त मंगलगेट येथे भाविकांना सरबतचे वाटप करण्यात आले. सज्जादा नशीन हजरत सय्यद मोहसीन अली शाह चिश्ती यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी सरबत वाटपाचा उपक्रम केला जातो. प्रारंभी सामुदायिक प्रार्थना करुन सरबत वाटपला प्रारंभ करण्यात आले. यावेळी बी.सी.एफ.आय. संस्थेचे सदस्य उपस्थित होते.

# ब्रिटिश पार्लमेंटमध्ये अहिल्यानगरच्या डॉ. दीपक हरके यांचा होणार सन्मान



लंडनला रवाना होण्यापूर्वी अहिल्यानगर येथील प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या संचालिका बी के राजेश्वरी दीदी यांनी तिलक लावून डॉ. दीपक हरके यांना शुभेच्छा दिल्या.

नगर – हाऊस ऑफ कॉमन्स, ब्रिटिश पार्लमेंट लंडन येथे १० जुलै रोजी जगभरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना एक्सलेंस अ‍ॅवॉर्डने गौरविण्यात येणार आहे. यामध्ये जगभरात १४३ देशात ८५०० हून अधिक सेवाकेंद्राच्या माध्यमातून निशुल्क ध्यानधारणा शिकविणाऱ्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचे ध्यानधारणा प्रशिक्षक ब्रह्माकुमार डॉ. दीपक हरके यांचा जगभरात भारताच्या प्राचीन राजयोगाचा प्रचार व प्रसार केल्याबद्दल एक्सलेंस अवॉर्ड २०२५ ने सन्मान करण्यात येणार आहे.

लंडनला रवाना होण्यापूर्वी अहिल्यानगर येथील प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या संचालिका बी के राजेश्वरी दीदी यांनी तिलक लावून त्यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी सहसंचालिका बी के सुप्रभा दीदी उपस्थित होत्या.

# डॉ. दर्शनप्रभाजी म.सा., डॉ. अनुपमाजी म.सा. आदी ठाणा ८ यांचा आनंदधाम येथे मंगल प्रवेश

### चातुर्मास काळ हे आत्मशुद्धीचे पर्व आहे : डॉ. अनुपमाजी म.सा.

नगर – जैन धर्मातील सर्वात पवित्र चातुर्मास पर्वा निमित्त साध्वी डॉ. दर्शनप्रभाजी म.सा., डॉ. अनुपमाजी म.सा. आदी ठाणा ८ यांचे रविवारी आनंदधाम येथे उत्साहात स्वागत करण्यात आले. तत्पूर्वी सारसनगर जैन स्थानकातून स्वागत मिरवणूक काढण्यात आली. महिला भाविक डोक्यावर मंगल कलश घेऊन तर पुरुष भाविक सफेद कपडे परिधान करून यात सहभागी झाले होते. मिरवणुकीवेळी महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा., अलोकऋषीजी म.सा., सत्यप्रभाजी म.सा., श्रृतीदर्शनाजी म.सा., डॉ. दर्शनप्रभाजी म.सा., डॉ.अनुपमाजी म.सा., विरतीसाधनाजी म.सा., विरागसाधनाजी म.सा., स्वयंसाधनाजी म..सा., श्रुतसाधनाजी म.सा., डॉ.लक्षितसाधनाजी म.सा., जिनेश्वराजी म.सा. उपस्थित होते. सकाळी ९.१५ वाजता साध्वीजींचा मंगल प्रवेश झाला.




जैन धर्मातील सर्वात पवित्र चातुर्मास पर्वा निमित्त साध्वी डॉ. दर्शनप्रभाजी म.सा., डॉ. अनुपमाजी म.सा. आदी ठाणा ८ यांचे रविवारी आनंदधाम येथे उत्साहात स्वागत करण्यात आले. तत्पूर्वी सारसनगर जैन स्थानकातून स्वागत मिरवणूक काढण्यात आली. महिला भाविक डोक्यावर मंगल कलश घेऊन तर पुरुष भाविक सफेद कपडे परिधान करून यात सहभागी झाले होते.

जैन श्रावक संघाचे अध्यक्ष हस्तीमल मुनोत, सेक्रेटरी संतोष बोथरा, आनंदराम मुनोत, बाबुशेठ लोढा, सतोष गांधी, मनिषा मुनोत, धार्मिक परीक्षा बोर्डचे अध्यक्ष नेमीचंद चोपडा (पाली, राजस्थान), अ‍ॅड. सचिन जगताप, बडीसाजन श्री संघाचे अध्यक्ष पेमराज बोथरा, नंदू भटेवडा, पारसमल छाजेड, शांतीलाल लुणावत, जवरीलाल कांकरिया, राजेंद्र सुराणा, नवीन गुगळे, भवरमल राका, हसमुखभाई पुनमिया, चेतनभाई कपासी, अस्मिताबाई कपासी, संजय चोपडा, विलास राठोड आदींसह श्रावक, श्राविका, मुले मुली यावेळी उपस्थित होते. जुलुसमध्ये वर्धमान महिला मंडळ, आनंद संस्कार शिक्षा अभियान, कीर्ती बहु मंडळ, जैन कॉन्फरन्स महिला मंडळाच्या सदस्य सहभागी झाले होते.

आनंदधाम येथे प्रियदर्शनी बहु मंडळ, सुरेले आनंदयात्री ग्रुपने स्वागतगीत सादर केले.

स्वागत करताना हस्तीमल मुनोत म्हणाले की, १० वर्षांनंतर पुन्हा एकदा डॉ. दर्शनप्रभाजी म.सा. यांचा चातुर्मास आनंदधाम येथे होत आहे. ही मोठी पर्वणी असून १० जुलै पासून चार महिने विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहे. याकाळात जप तप आराधना करून नवीन ऊर्जा प्राप्त करण्याची संधी लाभणार आहे. जास्तीत जास्त भाविकांनी याचा लाभ घ्यावा, विशेषतः युवा वर्गाने या कार्यक्रमांत सहभागी झाले पाहिजे.

संतोष बोथरा म्हणाले की, १० जुलै पासून रोज सकाळी ९ वाजता प्रवचन होणार आहे. चातुर्मासातील ही आध्यात्मिक पर्वणी प्रत्येकाला सकारात्मक विचार देणारी आहे. यात कुटुंबासह आवर्जून सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी केले.

नेमीचंद चोपडा म्हणाले, आनंदधाम हे तीर्थस्थळ प्रत्येकाला नवीन ऊर्जा देणारे आहे. याठिकाणी होणारा चातुर्मास मोठी पर्वणीच असते. अतिशय मंगलमय वातावरणात येथे जप तप केले जाते. भाविकांचा सहभाग व प्रतिसाद चातुर्मासातील प्रत्येक कार्यक्रमात दिसून येतो.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. अनुपमाजी म.सा. म्हणाल्या की, आचार्यश्रींच्या पवित्र भूमीत होणारा चातुर्मास ऐतिहासिक ठरेल. या भूमीतच आध्यात्मिक ऊर्जा आहे. चातुर्मास आत्मशुद्धीचे पर्व आहे. या काळात प्रत्येकाने फ्रिज सारखे रहावे. आपल्या हृदयाच्या कप्प्यात सर्वांना सामावून घ्यावे. थंडावा निर्माण करून सतत ताजेतवाने रहावे. हृदयाच्या विविध कप्प्यात निर्मल भावना जतन कराव्यात.

कार्यक्रमानंतर गौतम प्रसादीची व्यवस्था करण्यात आली होती.



हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक असलेल्या ऐतिहासिक मोहरम निमित्त खासदार निलेश लंके यांनी कोठला येथे हजरत इमाम हुसेन यांच्या सवारीचे दर्शन घेतले. यावेळी माजी महापौर अभिषेक कळमकर, उद्योजक अल्ताफ शेख, माजी नगरसेवक मुदस्सर शेख, माजी नगरसेवक योगीराज गाडे, मावळा संघटनेचे अध्यक्ष रामेश्वर निमसे आदींसह भाविक उपस्थित होते.

# आय.एम.एस. ग्रंथालय न्यूजलेटरचे प्रकाशन

नगर – शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या वर्षाची सांगता आयएमएस लायब्ररीच्या न्यूजलेटर खंड (१६,) जून २०२५ च्या प्रकाशनाने झाली. या कार्यक्रमात संचालक डॉ. एम. बी. मेहता यांच्या प्रमुख उपस्थितीत, उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस, विभागप्रमुख डॉ. प्रोनोती तेलोरे व डॉ. महेश पोतदार, लेखापाल नरेंद्र कदम, ग्रंथपाल डॉ. स्वाती बार्नबस आणि लायब्ररी कर्मचारी जितीन आढाव, सिराज मुलाणी, कु. कृष्णाकुमारी थोरे व राजेश कांबळे उपस्थित होते.



आय.एम.एस. ग्रंथालय न्यूजलेटरचे प्रकाशन करताना संचालक डॉ. एम. बी. मेहता आदी.

सन २००९-१० पासून सुरू असलेले हे न्यूजलेटर गेल्या अनेक वर्षांपासून एकहातीपणे ग्रंथपाल डॉ. स्वाती बर्नाबास यांनी संकलित व संपादित केले आहे. गेल्या वर्षभरात ग्रंथालयने शैक्षणिक, सांस्कृतिक आणि व्यावसायिक उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सहभागास प्रोत्साहन देत संस्थेच्या शिक्षण वातावरणात समृद्धी आणली. संस्थात्मक उपक्रमांमध्ये शिक्षक दिन साजरा करणे, ख्रिसमस डोनेशन ड्राईव्ह, रतन टाटा यांना अभिवादन व नासाच्या इंटरनॅशनल स्पेस अ‍ॅप चॅलेंजमध्ये सहभाग अशा उपक्रमांचा समावेश होता.

# संत तुकाराम महाराज साहित्यरत्न पुरस्काराने सरोज आल्हाट सन्मानित



नगर – साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल कवयित्री, मुक्त पत्रकार सरोज आल्हाट यांना राज्यस्तरीय जगद्गुरु संत तुकाराम महाराज साहित्यरत्न पुरस्कार २०२५ ने सन्मानित करण्यात आले.

आषाढी एकादशी व राजर्षी शाहू महाराज जयंती निमित्त आयोजित जगद्गुरु संत तुकाराम महाराज राज्यस्तरीय दुसऱ्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात सदर पुरस्कार संमेलन अध्यक्ष डॉक्टर गुंफा कोकाटे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

याप्रसंगी पैलवान नाना डोंगरे व्यायाम शाळा- निमगाव वाघाचे उद्घाटन करण्यात आले.

सदर संस्थेच्या नावे देण्यात येणाऱ्या या पहिल्याच पुरस्काराचा मान आल्हाट यांना मिळाल्याचे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष नाना डोंगरे यांनी केले.

# नगरमध्ये ९ जुलैला दिव्यांग कृत्रिम हातपाय व कॅलिपर्स मोजमाप आणि मोफत वितरण शिबीर

नगर – भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम कानपूर, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र अहिल्यानगर, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय व जानकीबाई आपटे मूकबधिर विद्यालय टिळक रोड यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात ९ जुलैला दिव्यांग कृत्रिम हातपाय व कॅलिपर्स मोजमाप आणि मोफत वितरण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

टिळक रोड येथील जानकीबाई आपटे मूकबधिर विद्यालयात सकाळी १० वाजता हे शिबिर होणार आहे. अस्थिव्यंग असलेल्या दिव्यांगांना आधार देण्याच्या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, सर्व अस्थिव्यंगांना या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय प्रमुख प्रशांत गायकवाड, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्रप्रमुख डॉ. अभिजीत दिवटे, प्रकल्प समन्वयक दीपक उमाप, जानकीबाई आपटे विद्यालय मुख्याध्यापक तथा तालुका समन्वयक विजय आरोटे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी विजय आरोटे ९३२५१०१९९४ व जी.आर. जाधव ८६६८५१७५८४.

# केडगाव येथील शिक्षिका सौ. शबाना शेख यांना डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम राष्ट्रीय गौरव पुरस्कार



केडगाव – केडगाव येथील आदर्श शिक्षिका सौ. शबाना शाहरुख शेख यांना 'भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम राष्ट्रीय गौरव पुरस्कार २०२५' ने गौरवण्यात आले आहे. हा पुरस्कार ए. डी. फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने देण्यात आला.

सौ. शबाना शेख या सध्या ज्ञानसाधना गुरुकुल, जगदंबा कॉम्प्लेक्स, केडगाव येथे कार्यरत आहेत. त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्ट योगदान, समाजसेवा, आणि प्रेरणादायी कार्यामुळे त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

# विद्यार्थ्यांनी रियाजाला महत्व द्यावे

**ज्येष्ठ संगीतज्ञ लक्ष्मणराव डहाळे यांचे प्रतिपादन; श्रुती संगीत निकेतन आयोजित एकादशीच्या निमित्ताने अभंग आणि भक्तीगीत गायन स्पर्धेच्या पारितोषिक वितरण**

नगर – स्पर्धांमध्ये भाग घेताना आणि एकूणच संगीत साधना करत असताना विद्यार्थ्यांनी रियाजाला महत्व दिले पाहिजे असे प्रतिपादन ज्येष्ठ संगीतज्ञ लक्ष्मणराव डहाळे यांनी केले.

श्रुती संगीत निकेतन आयोजित आषाढी एकादशीच्या निमित्ताने अभंग आणि भक्तीगीत गायन स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी ते बोलत होते. सदर स्पर्धा निकेतन मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेचे उदघाटन प्रमुख अतिथी अशोक गांधी यांनी केले.

संस्थेच्या अध्यक्षा डॉ. धनश्री खरवंडीकर यांनी संस्थेने कलाकार, साथीदार, निवेदक, श्रोते, गायक अभिनेते, अभिनेत्री तसेच कार्यक्रम आयोजन करणारे असे अनेक विद्यार्थी घडविले असे प्रतिपादन केले.



श्रुती संगीत निकेतन आयोजित आषाढी एकादशीच्या निमित्ताने अभंग आणि भक्तीगीत गायन स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ पार पडला.

या स्पर्धेत सुमारे ५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. शालेय आणि खुल्या गटात ही स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेचे परीक्षण संगीत शिक्षिका सौ.अनुजा कुलकर्णी आणि सौ. स्नेहल उपाध्ये यांनी केले. उत्कर्ष दळवी, सुपर्ण प्रताप यांनी तबल्यावर तर शौनक कुलकर्णी आणि समर्थ कोर्टीकर यांनी हार्मोनियम वर साथसंगत केली. आर्या कुलकर्णी आणि स्वराली जोशी यांनी सूत्रसंचालन केले. याप्रसंगी अशोक गांधी, वैजयंता पंचमुख, भूषण भणगे, ऋषिकेश कुलकर्णी आदि उपस्थित होते.

स्पर्धेच्या यशस्वीते साठी वेदांत कुलकर्णी, वैष्णवी पटवा, शौनक कुलकर्णी, सौ.जयश्री काळे इत्यादींनी परिश्रम घेतले. गटनिहाय पुढीलप्रमाणे शालेय गट – प्रथम क्रमांक शौनक कुलकर्णी, द्वितीय क्रमांक आरोही बेडेकर, तृतीय क्रमांक अनुज भालेराव, उत्तेजनार्थ स्वरा विलायते आणि भक्तिप्रिया जोशी., खुला गट – प्रथम क्रमांक भार्गव देशपांडे, द्वितीय क्रमांक केतकी कुलकर्णी, तृतीय क्रमांक वेदांत कुलकर्णी, उत्तेजनार्थ प्रतिक्षा काळे आणि चेतना नवले

# आरोही संगीत विद्यालय प्रस्तुत आषाढी एकादशीच्या पूर्वसंध्येला भक्तिरसात न्हालेला अभंग गायनाचा कार्यक्रम

नगर – श्रद्धा, भक्ती आणि संत परंपरेने नटलेल्या आषाढी एकादशीच्या पावन पूर्वसंध्येला आरोही संगीत विद्यालय यांच्या वतीने एक सुरेल आणि भक्तिभावाने परिपूर्ण अभंग गायन कार्यक्रम आयोजित करण्यात आले. हा कार्यक्रम आरोही संगीत विद्यालय, नवनागापूर येथे पार पडला.



आषाढी एकादशीच्या पावन पूर्वसंध्येला आरोही संगीत विद्यालय यांच्या वतीने एक सुरेल आणि भक्तिभावाने परिपूर्ण अभंग गायन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

संत तुकाराम, संत नामदेव आणि संत सावता माळी यांच्या अमृतवाणीने सजलेली ही संध्याकाळ श्रोत्यांना अध्यात्मिक अनुभव देणारी ठरली. कार्यक्रमाची सुरेल प्रस्तुती अहिल्यानगर येथील गायिका सौ. ऋतुजा कुलकर्णी पाठक यांनी दिली. त्यांच्या सुमधुर आवाजात सादर करण्यात आलेले अभंग श्रोत्यांच्या मनाला भावले. तबल्यावर स्वप्नील खराडे आणि संवादिनीवर आदेश चव्हाण यांनी साथ केली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये आरोही संगीत विद्यालयाच्या संचालिका सौ. शितल स्वप्निल खराडे यांचे योगदान होते. विद्यालयातील तबला परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. या प्रसंगी रेडिओ सिटीचे रेडिओ जॉकी प्रसन्न पाठक, श्रुती देशपांडे, श्रुती चव्हाण तसेच अनेक संगीतप्रेमी, विद्यार्थी, पालक आणि अध्यात्मिक अभिरुची असलेले रसिक उपस्थित होते.

# श्री रेणुका ट्रॅव्हल्सतर्फे विविध सहलींचे आयोजन

**राजस्थान, नेपाळ, केरळ या नव्या सहली होणार**

नगर - येथील श्रीरेणुका ट्रॅव्हल सर्व्हिसेस यात्रा कंपनीने खास लोकाग्रहास्तव माहुर-शेगांव दर्शन, ज्योतिर्लिंग यात्रा, अष्टविनायक दर्शन, ११ मारुती दर्शन, कोकण दर्शन, द्वारका दर्शन, गोवा स्पेशल, शास्त्रोक्त पद्धतीने नर्मदा परिक्रमा, राजस्थान स्पेशल, नेपाळ स्पेशल, केरळ स्पेशल, जगन्नाथपुरी-गंगासागर दर्शन अशा विविध सहलींचे आयोजन केले आहे. या वर्षाअखेरीपर्यंत या भरगच्च सहली होत असून पर्यटकांसाठी ही एक चांगली संधी आहे, असे संचालिका सौ. शुभांगी क्षीरसागर यांनी सांगितले.

६ ते ८ ऑगस्ट दरम्यान तीन दिवस होत असलेल्या शेगांव-माहुर दर्शनमध्ये सहभागितांना शेगांव (समाधी दर्शन), माहुरगड, लाड कारंजे, देवगड आदि ठिकाणे पाहता येतील. ११ ते १५ ऑगस्ट दरम्यान पाच दिवस दोन ज्योतिर्लिंग यात्रा होणार आहे. यामध्ये शेगांवसह ओंकारेश्वर, महेश्वर, उज्जैन आदि ठिकाणच्या मंदिर दर्शनाचा लाभ घेता येईल. अष्टविनायक दर्शन यात्रा १७ ते १९ ऑगस्ट दरम्यान होणार असून, यामध्ये अष्टविनायक दर्शनासह देहू आळंदी तीर्थक्षेत्री भेट देता येणार आहे.

श्रीरामदास स्वामी स्थापित ११ मारुती दर्शन सहलीचेही आयोजन 'श्री रेणुका'च्यावतीने ९ ते ११ सप्टेंबर व पुढील वर्षी २७ ते २९ जानेवारी असे प्रत्येकी ३ दिवस करण्यात आले आहे. यामध्ये श्री रामदास स्वामी स्थापित ११ मारुती दर्शनासह नरसोबावाडी, मोरगांव आदि ठिकाणे भाविकांना पाहता येतील व दर्शनाचा लाभ घेता येईल. यानंतर १० ते १५ ऑक्टोबर दरम्यान सहा दिवस होणार्या कोकण दर्शन यात्रेत पाली, हरिहरेश्वर, दिवेआगार, मुरूड-जंजिरा, मार्लेश्वर, गणपतीपुळे, पावस, मालवण, सिंधुदुर्ग, तारकर्ली, कोल्हापूर आदि ठिकाणांना भेट देता येईल.

द्वारका दर्शन (एक धाम) या २२ डिसेंबर ते १ जानेवारी दरम्यान होणार असलेल्या सहलीत गरुडेश्वर, कुबेर भंडारी, स्टॅच्यु ऑफ युनिटी (सरदार सरोवर), सोरटी सोमनाथ, पोरबंदर, नागनाथ (ज्योतिर्लिंग दर्शन), भालकातीर्थ, वेरावळ, गिरनार, मातृगया, मूळ द्वारका, बेट द्वारका आदि ठिकाणांचा समावेश आहे.

पुढील वर्षी २२ ते २७ फेब्रुवारी दरम्यान होणार्या गोवा स्पेशल सहलीमध्ये कोल्हापूर, सावंतवाडी, नरसोबाची वाडी, साऊथ गोवा, नॉर्थ गोवा, ओल्ड गोवा, मंगेशी मंदिर, शांतादूर्गा मंदिर, चर्च विविध बिचेस् इ. ठिकाणे पर्यटकांना पाहता येणार आहेत, अशी माहिती श्यामकांत क्षीरसागर यांनी दिली.

पुढील वर्षी ५ ते २१ जानेवारी व २ ते १८ फेब्रुवारी दरम्यान नर्मदा परिक्रमा शास्त्रोक्त पद्धतीने होत आहे. या परिक्रमेमध्ये शेगांव, ओंकारेश्वर, प्रकाशा, बडवानी, बिमलेश्वर, निलकंठेश्वर, नारेश्वर, गरुडेश्वर, महेश्वर, उज्जैन, नेमावर, अमरकंटक, महाराजपूर, होशंगाबाद, ओंकारेश्वर आदि ठिकाणी भाविकांना जाता येईल. प्रत्येकी १७ दिवसांची ही यात्रा आहे. यात्रेसाठी आगाऊ नावनोंदणी आवश्यक आहे. या नर्मदा परिक्रमा यात्रेसाठी भाविकांनी बुकींग करावे, असे आवाहन सौ. दीपा जोशी यांनी केले आहे. या दोन्ही यात्रा २ बाय २ लक्झरी ४९ सीटर बसने होणार आहेत.

रेणुका ट्रॅव्हल्सतर्फे प्रथमच राजस्थान स्पेशल (मेवाड व मारवाडसह), नेपाळ स्पेशल व केरळ स्पेशल (कन्याकुमारी, रामेश्वरसह) यात्रांचे नव्याने नियोजन करण्यात आले आहे. राजस्थान स्पेशल यात्रा १४ दिवसांची असून, २६ ऑक्टोबर ते ८ नोव्हेंबर दरम्यान होत आहे. यामध्ये जयपूर, बिकानेर, जैसलमेर, अजमेर, माऊंटअबू, जोधपूर, उदयपूर, चितोडगड, पुष्कर, एक लींगजी, नाथद्वार आदि ठिकाणांचा समावेश आहे. यासाठी ३० जुलैपर्यंत नोंदणी करणे आवश्यक आहे. नेपाळ स्पेशल यात्रा १४ दिवसांची असून, १५ ते २८ नोव्हेंबर दरम्यान होत आहे. यामध्ये प्रयागराज, अयोध्या, गोरखपूर, लुंबिनी, पोखरा, भैरवा, काठमांड, मनोकामना देवी, चितवन, पशुपतीनाथ, जनकपुरी, सीतामढी आदि ठिकाणांचा समावेश आहे. यासाठी ३० ऑगस्टपर्यंत नोंदणी करणे आवश्यक आहे.केरळ स्पेशल यात्राही १४ दिवसांचीच असून, ५ ते १८ डिसेंबर दरम्यान होत आहे. यामध्ये गुरुवायुर, कालाडी, कोचीन, मुन्नार, थेक्कडी (पेरियार), मदुराई, रामेश्वरम, कन्याकुमारी, सुचिद्रम, कोवलम बीच, तिरुअनंतपुरम, आलेप्पी (बॅकवॉटर) आदि ठिकाणांचा समावेश आहे. यासाठी १५ सप्टेंबरपर्यंत नावनोंदणी करता येईल. या तीनही यात्रा रेल्वेने (एसी, ३ टियर कोच) होणार आहेत.

या सहल कार्यक्रमात जगन्नाथपुरी-गंगासागर दर्शन या एकधाम यात्रेचेही आयोजन करण्यात आले असून, ही यात्रा पुढील वर्षी रेल्वेने (एसी, ३ टियर कोच) होणार आहे. ७ ते १५ मार्च अशी ९ दिवस होत आहे. यासाठी १५ डिसेंबरपर्यंत बुकींग करावे लागेल. यामध्ये कलकत्ता, गंगासागर, भुवनेश्वर, कोणार्क, साक्षीगोपाल, चिलका सरोवर आदि ठिकाणांना भेटी देता येणार आहेत.

सर्व शासकीय नियमांचे पालन कंपनीतर्फे करण्यात येते. पर्यटकांच्या संपूर्ण सुरक्षेची काळजी घेण्यात येते. रेणुका ट्रॅव्हल्समार्फत आयोजित करण्यात येणार्या सर्वच सहलींसाठी मर्यादित जागा असल्याने व्यवस्थित सोय होते. सहलीमध्ये स्वतः आयोजक पती-पत्नी तसेच त्यांचा कर्मचारीवर्ग सहभागी होत असल्याने घरगुती पद्धतीचे जेवण देण्यात येते. वृद्धांसाठी केअरटेकर असल्याने वैयक्तिक लक्ष देण्यात येते. राहण्याची उत्तम सुविधा करण्यात येते. वाजवी व रास्त दर असल्याने ही कंपनी अल्पकाळातच लोकप्रिय ठरली असून पर्यटकांची खूप आधीच वेगवेगळ्या सहलींसाठी विचारणा होते. ही आपल्यावरील विश्वासाची पावती असल्याचे आम्हाला वाटते, असे संचालक श्यामकांत क्षीरसागर यांनी सांगितले. सहलींमध्ये सहभागी होण्यासाठी व अधिक माहितीसाठी रेणुका ट्रॅव्हल्स सर्व्हिसेस (डॉ. पानसंबळ हॉस्पिटलमागे, कुष्ठधाम रस्ता, निलम स्टोअर्सजवळ, पोलिस कॉलनी, सावेडी, नगर, मोबाईल क्रमांक ९९२२२४०५१५ व ९४०५०३२६९८) आणि सौ. दिपा जोशी (मो. ८३७९८४१२६१, ९४०४४०१६९९) येथे नाव नोंदवावे, असे सांगण्यात आले आहे.


सारसनगर येथील कै. दामोधर विधाते (मास्तर) प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त भक्तीमय रंगलेल्या रिंगण सोहळ्यात सहभागी झालेले विद्यार्थी.

# विधाते विद्यालयात रंगला रिंगण सोहळा; बाल वारकऱ्यांच्या दिंडीचे उत्साहात स्वागत

**विठ्ठल नामाच्या जय घोष, टाळ-मृदंगाचा गजर आणि लेझिम व ढोल पथकासह रंगला सोहळा**

नगर - सारसनगर येथील कै. दामोधर विधाते (मास्तर) प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त भक्तीमय वातावरणात दिंडी काढण्यात आली. विठ्ठल विठ्ठल... विठ्ठला हरी ओम विठ्ठला..., ज्ञानबा तुकाराम..., विठ्ठल माझा माझा... मी विठ्ठलाचा..., माऊली...माऊली... या भक्तीगीतांमध्ये तल्लीन होऊन विठ्ठल नामाच्या जय घोषात, टाळ-मृदंगाच्या गजरात, लेझिम व ढोल पथकासह दिंडी सोहळा रंगला होता.

शालेय संस्थेचे सरचिटणीस प्रा. शिवाजी विधाते यांनी शाळेत राबविण्यात आलेल्या दिंडीचे कौतुक करुन आषाढी एकादशीच्या शुभेच्छा दिल्या. मुख्याध्यापक शिवाजी म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली या दिंडी सोहळ्याचे नियोजन करण्यात आले होते. यावेळी माध्यमिकचे मुख्याध्यापक संतोष सुसे, लता म्हस्के, सविता सोनवणे, राधाकिसन क्षीरसागर, योगेश दरवडे, भाऊसाहेब पुंड, सचिन बर्डे, अमोल मेहत्रे, सारिका गायकवाड, निता जावळे, सविता सोनवणे, मिनाक्षी घोलप आदी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी पारंपारिक वाद्याच्या गजरात लेझिमचे डाव सादर केले. दिंडीत विद्यार्थी वारकरींच्या वेशभूषेत तर विद्यार्थिनी डोक्यावर तुलस वृंदावन घेऊन सहभागी झाल्या होत्या. भगवे ध्वज, टाळ, मृदूंग व वीणा हातात घेऊन बाल वारकऱ्यांनी केलेल्या विठ्ठल नामाच्या गजराने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. विठ्ठल-रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, जिजाऊ, श्रीकृष्ण, मीराबाई, मुक्ताबाई व संत तुकारामांच्या वेशभूषा परिधान केलेले लहान विद्यार्थी दिंडीचे आकर्षण ठरले.

शाळेच्या मैदानात विद्यार्थ्यांनी केलेल्या रिंगण सोहळ्याने उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फिटले. यावेळी विद्यार्थिनी व शिक्षिकांनी फुगड्यांचा फेर धरला होता. दिंडीतील पालखीचे चौका-चौकात स्वागत करण्यात आले.

लहान मुलांची दिंडी पहाण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती.

# जे.एस.एस. गुरुकुलची शिक्षण आणि संस्कारांची शिदोरी घेऊन निघाली दिंडी

नगर - विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच संस्काराचे धडे देणाऱ्या जे.एस.एस. गुरुकुलमध्ये शिक्षण आणि संस्कारांची शिदोरी घेऊन विद्यार्थ्यांचा दिंडी सोहळा रंगला होता. टाळ मृदुंगाच्या गजरात, विठू नामाच्या जयघोषात, पारंपारिक वारकऱ्यांच्या वेशभूषेत, हातात भगवे ध्वज घेतलेले विद्यार्थी दिंडीत सहभागी झाले होते.

दिंडीचा मुख्य आकर्षण ठरलेला रिंगण सोहळा पार पडला. यामध्ये विद्यार्थ्यांनी चित्तथरारक मानवी मनोरे उभारुन ग्रामस्थांचे मने जिंकली. दिंडीत विठ्ठल-रुक्मिणी, ज्ञानेश्वर माऊली, संत तुकाराम, मुक्ताबाई यांच्या वेशभूषेत असलेल्या विद्यार्थ्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

दिंडीची सुरुवात शाहूनगर येथील विठ्ठल-रक्मिणी मंदिरातून झाली. शाहूनगर चौक येथे बाल वारकऱ्यांचा रिंगण सोहळा पार पडला. साई मंदिर परिसरात विठ्ठल नामाच्या भक्तीगीतावर फुगड्या खेळण्याचा आनंद विद्यार्थ्यांनी घेतला. संपूर्ण परिसर विठ्ठल नामाच्या गजराने दुमदुमून गेला होता. बालकांची दिंडी पाहण्यासाठी केडगाव ग्रामस्थांनी गर्दी केली होती.

जे.एस.एस. गुरुकुलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबर संस्कार रुजविण्याच्या उद्देशाने सर्व सण-उत्सव साजरे केले जात असल्याची माहिती विद्यालयाचे प्राचार्य आनंद कटारिया आणि निकिता कटारिया यांनी दिली. दिंडी यशस्वी करण्यासाठी अक्षय नायडू, निखिल बेदरे, हर्षा कार्ले, वासंती शेटीया, मीरा थोरात, अनुपमा तोडमल, वैशाली देशमुख, योगिता पाठक, पगारिया, शिफा शेख, आरती उरमुडे, पृथ्वी काटे, कांचन पगारिया, शितल भुजबळ, शुभांगी कार्ले, फिरदोस पठाण, बिना आरवडे, सायली सरोदे, योगिता कुकडे, शितल जाधव आदींसह शिक्षिका व शिक्षकेतरांनी परिश्रम घेतले.


जे.एस.एस. गुरुकुलच्या दिंडीमध्ये सहभागी झालेले विद्यार्थी.



नालेगाव गाडगीळ पटांगण येथील विठ्ठल रुक्माई मंदिरात आरती करण्यात आली. याप्रसंगी झालेली भाविकांची गर्दी. (छाया - लहू दळवी)

# आषाढी एकादशीनिमित्त नालेगाव गाडगीळ पटांगणातील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात महाआरती व प्रसादाचे वाटप

नगर - श्रद्धा, भक्ती आणि संत परंपरेने नटलेल्या आषाढी एकादशीच्या पावन दिवशी नालेगाव गाडगीळ पटांगण येथील विठ्ठल रुक्माई मंदिरात महिला भजनी मंडळाचा गायनाचा कार्यक्रम झाला.

यावेळी ग्रामस्थांच्या हस्ते महाआरती करण्यात आली तसेच विजय चितळे यांच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. विठ्ठल रुक्मिणी मंदिर हे भाविकांचे श्रद्धास्थान असल्यामुळे वर्षभर विविध अध्यात्मिक धार्मिक कार्यक्रम उत्साहात होत असतात. सर्व जाती धर्मातील नागरिक एकत्र येत एकोप्याचे दर्शन घडविण्याचे काम केले जाते. यावेळी विठुरायाच्या नामघोषाने परिसर अक्षरशा दुमदुमून गेला होता.

यावेळी विजय चितळे, छायाताई चितळे, माजी नगरसेवक दत्तात्रेय मुदगल, सुनिता मुदगल, राजेंद्र कवडे, राहुल कवडे, खंडेराव कवडे, प्रवीण वाघ सुनील चितळे, चांगदेव लांडे, राजू कदम, मुक्ताबाई कवडे, संगीता अडोळे आदी उपस्थित होते

सकाळच्या सत्रात श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या अभिषेकासाठी ओम रामदास खंडागळे व कल्याणी ओम खंडागळे या नवदांपत्याला आजच्या अभिषेकाचा मान देण्यात आला. याप्रसंगी छायाताई चितळे यांनी त्यांचे स्वागत केले.

# गांधी मैदानच्या श्री मार्कंडेय विद्यालयात भरली विठ्ठल नामाची शाळा

**बाल वारकऱ्यांची दिंडी उत्साहात; उत्साहत रंगला रिंगण सोहळा**

नगर - शहरातील गांधी मैदान येथील श्री मार्कंडेय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे आषाढी एकादशी निमित्त बाल वारकऱ्यांचा दिंडी सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी दिंडीचा मुख्य आकर्षण ठरलेला रिंगण सोहळा पार पडला.

दिंडीत विठ्ठल-रुक्मिणी, ज्ञानेश्वर माऊली, संत तुकाराम, मुक्ताबाई यांच्या वेशभूषेत असलेल्या विद्यार्थ्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. टाळ मृदुंगाच्या गजरात, विठू नामाच्या जयघोषात, पारंपारिक वारकऱ्यांच्या वेशभूषेत, हातात भगवे ध्वज घेतलेले विद्यार्थी उस्फूर्तपणे दिंडीत सहभागी झाले होते.


श्री मार्कंडेय विद्यालयात भरलेल्या विठ्ठल नामाच्या शाळेत वारकऱ्यांच्या वेषात सहभागी झालेले विद्यार्थी.

इयत्ता ५ वी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले विठ्ठलाचे गीताने वातावरण प्रसन्न बनले होते. तर मथुरा आढाव यांनी गायलेले अभंग, संत जनाबाई यांची गवळण आणि कल्याणी म्याना यांनी गायलेले भक्तीगीताने परिसर भक्तीमय झाले होते. कार्यक्रमास पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष बाळकृष्ण सिद्दम, विद्यालयाचे मुख्याध्यापक संदिप छिंदम, उपमुख्याध्यापक पांडुरंग गोने, पर्यवेक्षक प्रमोद चन्ना, शिक्षक प्रतिनिधी अर्चना साळुंके, प्रा. बत्तीन पोटयान्ना प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्रीनिवास मुत्याल आदींसह पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयश्री मेहेर यांनी केले. आषाढी एकादशीनिमित्त कविता गुडेवार यांनी उत्कृष्ट असे फलक लेखन केले. दिंडीचे उत्कृष्ट नियोजन रेणुका खरदास यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शालेय शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.


डायमंड नर्सरी प्रि-स्कूल मधील चिमुकल्यांची बालदिंडी काढण्यात आली होती.

# डायमंड नर्सरी प्रि-स्कूलमधील चिमुकल्यांची बालदिंडी उत्साहात

नगर - शहरातील दक्षतानगर, पाईपलाइन रोड मधील डायमंड नर्सरी प्रि-स्कूल तर्फे ५ जुलै ला आषाढी एकादशी निमित्त चिमुकल्यांची बालदिंडी काढण्यात आली. तपोवन रोड ते ढवणवस्ती येथील भोलेश्वर मंदीर ही बालदिंडी काढण्यात आली.

विठ्ठल रुक्मिणी व त्यांच्या सोबत छोटे छोटे वारकरी यांनी टाळ, झेंडा व विठ्ठल नामाच्या जयघोषात सर्वांचे लक्ष वेधून घेतले. यावेळी चिमुकल्यांनी रिंगण देखील केले. यावेळी स्कूल च्या मुख्याधापिका सौ. अनिता ढगे यांच्या सोबत स्कूल च्या सर्व शिक्षिका व सहायक यांनी मेहनत घेतली. चिमुकल्यांसोबत पालकांनीही मोठ्या प्रमाणात सहभाग दर्शविला.

# अंबिका विद्यालयाच्या दिंडीने केडगाव झाले विठ्ठलमय

**स्त्री भ्रूणहत्या थांबवा, झाडे लावा पर्यावरण वाचवा, सार्वजनिक स्वच्छतेचा संदेश देत निघाली दिंडी**

नगर - केडगाव येथील अंबिका विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशीनिमित्त काढलेल्या दिंडीने संपूर्ण परिसर विठ्ठलमय झाले होते. मोठ्या उत्साहात निघालेली बाल वारकऱ्यांची दिंडी उत्साहात पार पडली. या दिंडीत श्री विठ्ठल-रुक्मिणी, ज्ञानेश्वर माऊली, तुकाराम महाराज व विविध संत व वारकऱ्यांच्या वेशभूषेत सहभागी झालेल्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सर्वांचे लक्ष वेधले.


अंबिका विद्यालयाच्या दिंडीमध्ये सहभागी झालेले शिक्षक, पालक व विद्यार्थी.

महाराष्ट्रातील वारकरी सांप्रदायाची परंपरा विद्यार्थ्यांना ज्ञात होण्यासाठी या दिंडे सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या दिंडीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी स्त्री भ्रूणहत्या थांबवा, झाडे लावा पर्यावरण वाचवा, सार्वजनिक स्वच्छतेवर सामाजिक संदेश दिला. केडगाव परिसरातून निघालेल्या या दिंडीने संपूर्ण परिसर भक्तीमय बनले होते. शाहूनगर येथील नव्याने बांधलेल्या अंबिका विद्यालयाच्या प्रांगणात या दिंडीचा समारोप रिंगण सोहळ्याने झाला. यामध्ये बाल वारकरी आणि विद्यालयातील शिक्षकांनी फुगडीचा फेर धरला होता.

संत तुकाराम आणि ज्ञानेश्वर महाराज यांच्या विचारांची रुजवण समाजामध्ये करण्याचे कार्य रयत शिक्षण संस्था करत आहे. या दिंडीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये आपल्या संस्कृतीची ओळख करुन देण्यात आली असल्याची भावना रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभागीय अधिकारी आणि विद्यालयाचे प्राचार्य नवनाथ बोडखे यांनी व्यक्त केली.

यावेळी उपमुख्याध्यापक सुखदेव मुरूमकर, पर्यवेक्षक अभयकुमार चव्हाण, सिताराम जपकर, संदीप गाडीलकर, सुधिर आघाव, प्रा. शिंदे, प्राध्यापिका राधिका मते, ऋषिकेश दळवी, कांचन ससे, शितल भिंगारदिवे, प्रियंका सातपुते, अश्विनी कल्हापूरे, जयश्री जपकर, वर्षा चौरे, रेखा रासकर, स्वाती जाधव, कविता शेळके, शुभांगी बनकर, गायत्री गुंजाळ, अश्विनी कांबळे, मिनाज पठाण, कीर्ती पावसे, सुवर्णा कांबळे, अवंती कुलकर्णी, मदतनीस सविता औटी, सुवर्णा शिंदे, रेखा शेळके आदींसह शिक्षिका, पालक व विद्यार्थी उपस्थित होते. आभार प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका पूजा गोरे यांनी मानले.

# लिटिल वंडर स्कूलमध्ये दिंडी सोहळा भक्तीमय वातावरणात पार पडला

नगर - लिटिल वंडर स्कूलमध्ये ५ जुलै रोजी दिंडी सोहळा पारंपरिक भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. संपूर्ण शाळा परिसर टाळ-मृदुंगाच्या गजराने आणि ज्ञानोबा-तुकारामांच्या जयघोषांनी दुमदुमून गेला होता. विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून भगव्या पताका हातात घेतल्या होत्या. काही विद्यार्थ्यांनी संतांचे वेष धारण केले होते. दिंडीमध्ये टाळ, मृदुंग, अभंग गायन, भजन आणि कीर्तन सादर करण्यात आले. शाळेच्या परिसरात फुलांनी सजावट करण्यात आली होती. दिंडी मार्गक्रमण करत असताना विद्यार्थ्यांनी शिस्तबद्धरित्या सहभाग घेतला. शाळेतील शिक्षक, शिक्षिका आणि कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.मुख्याध्यापक खेडकर सर आणि संचालिका चेमटे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली हा दिंडी सोहळा यशस्वीरीत्या पार पडला. विद्यार्थ्यांना प्रसादाचे वितरण करण्यात आले.


लिटिल वंडर स्कूलमध्ये दिंडी सोहळा भक्तीमय वातावरणात पार पडला.

# अर्थजगत

**भाड्याच्या रकमेवर टीडीएस वजा न केल्याने एका नोकरदार व्यक्तीला तब्बल १ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आल्याची घटना नुकतीच घडली. अभिषेक नावाच्या सदर व्यक्तीने दरमहा ५५,००० भाडे देताना सेक्शन १९४-आयबीअंतर्गत आवश्यक असलेला २ टक्के टीडीएस कापून घेणे टाळले. ही चूक केवळ दुर्लक्षामुळे झाली होती, मात्र परिणाम अतिशय गंभीर होता. कारण आयकर विभागाकडून त्याला दंडासोबत व्याज आणि विलंब शुल्कही भरावे लागले.**

## टीडीएस वजावट विसरलात?




सामान्य करदात्यांच्या डोळ्यांत अंजन घालणारी आहे. कारण यावरून स्पष्ट होते की टीडीएस ही केवळ व्यावसायिकांपुरती मर्यादित बाब राहिलेली नाही. अभिषेक दरमहा ५५ हजार रुपये घरभाडं देत होता, पण त्याने भारतीय आयकर कायद्याच्या कलम १८४ क अंतर्गत आवश्यक असलेली दोन टक्के टीडीएस वजावट केली नाही. या चुकांमुळे त्याच्यावर विलंब शुल्क, व्याज आणि मुख्य दंड अशी एकत्रित आर्थिक जबाबदारी येऊन पडली.

कर वजावट आणि त्याचा भरणा करणे, ही केवळ तांत्रिक प्रक्रिया नसून कायदेशीर जबाबदारी आहे आणि तिचे उल्लंघन केल्यास शिक्षेच्या तरतुदी देखील आहेत.

एखाद्या व्यक्तीने टीडीएस वजावट केली नाही किंवा तो वेळेवर सरकारकडे भरला नाही, तर दररोज २०० रुपये इतकं विलंब शुल्क आकारलं जातं. तसेच वजावट न केल्यास प्रत्येक महिन्याला एक टक्का व्याज आकारलं जातं. याशिवाय, १० हजार ते एक लाख रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो आणि काही प्रकरणांमध्ये तीन महिने ते सात वर्षांपर्यंत तुरुंगवासाची तरतूद आहे.

ही तरतूद केवळ घरभाड्यापुरती मर्यादित नाही. यंत्रसामग्री, फर्निचर, कार्यालयीन जागा, दुकाने, व्यावसायिक वापरासाठीच्या इमारती आदींसाठी दिल्या जाणाऱ्या भाड्यांवरही टीडीएस आकारला जातो. जर वार्षिक भाड्याची रक्कम ६ लाख रुपयांपेक्षा अधिक असेल तर यंत्रसामग्रीसाठी २ टक्के आणि इतर भाड्यांवर १० टक्के इतकी वजावट केली जाते.

मालमत्ता खरेदी करतानाही टीडीएस लागू होतो. मालमत्तेची किंमत ५० लाख रुपयांहून अधिक असेल, तर १ टक्का टीडीएस वजा करून ती रक्कम सरकारकडे भरावी लागते. व्यावसायिक, ठेकेदार, बांधकाम व्यावसायिक, एजंट आदींना जर एखाद्या व्यक्तीने वर्षभरात ५० लाखांहून अधिक रक्कम दिली असेल, तर त्या व्यवहारावरही दोन टक्के टीडीएस आकारावा लागतो.

सध्या डिजिटल गुंतवणुकीमध्ये लोकप्रिय ठरलेल्या चलन व्यवहारांवरसुद्धा टीडीएस लागू आहे आणि त्यासाठी एक टक्क्याची तरतूद आहे. अनेकदा सामान्य व्यक्ती हे समजून घेत नाहीत की वैयक्तिक स्वरूपाचे व्यवहारही आता कर चौकटीत येतात आणि त्यावरही कायदेशीर बंधनं आहेत.

टीडीएसचा नियम केवळ कंपन्या, व्यापारी किंवा संस्थांसाठीच लागू नाही, तर घरभाडं, मालमत्ता खरेदी, सेवासंपादन यांसारख्या व्यवहारांमध्येही तो बंधनकारक झाला आहे.

कर नियमांचे पालन न केल्यास होणाऱ्या आर्थिक फटक्यामुळे अनेक कुटुंबांचे बजेट कोलमडू शकते. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने आपल्या व्यवहारांचे मूल्य, स्वरूप आणि टी डी एस लागू होतो का, हे तपासून घेणं आवश्यक आहे. योग्य रक्कम वजवून ती सरकारकडे भरली गेली पाहिजे आणि त्याबाबतची कागदपत्रं देखील ठरलेल्या कालमर्यादेत तयार करून संबंधित व्यक्तीला दिली गेली पाहिजेत.

केवळ अज्ञानामुळे किंवा दुर्लक्षामुळे जर मोठ्या प्रमाणावर दंड भरावा लागत असेल तर ती चूक पूर्णतः टाळता येण्याजोगी आहे. त्यामुळेच कर साक्षरतेचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत चालले आहे.

आर्थिक व्यवहार करताना आपण काय करतो आहोत, त्याचे काय परिणाम होतील, याची पूर्ण कल्पना ठेवणं गरजेचं आहे. नियमांचा अभ्यास करून, थोडी दक्षता घेतली असती, तर लाखो रुपयांचा फटका टाळता आला असता. प्रत्येक नोकरदार व्यक्ती, व्यावसायिक, निवृत्त व्यक्ती, गृहिणी, गुंतवणूकदार यांनी आपल्या व्यवहारांची टपशिलाने माहिती ठेवावी आणि शक्य असल्यास तज्ज्ञ सल्लागारांचा सल्ला घ्यावा. कारण कर नियम ही केवळ सरकारची सक्ती नसून आपल्या आर्थिक सुरक्षिततेची हमी आहे. योग्य माहिती, जागरूकता आणि वेळेत केलेले पालन हेच अशा आर्थिक अडचणींपासून वाचवू शकतात.




## म्युच्युअल फंड तारण ठेवताय?

जर आपण म्युच्युअल फंडामध्ये गुंतवणूक केली असेल आणि एक ठराविक निधी साठवला असेल, तर त्या फंडावर आधारित कर्ज घेणे हा एक सुरक्षित, सोपा आणि कमी व्याजदराचा पर्याय ठरू शकतो. सामान्यतः जीवनात अशा काही वेळा येतात की अचानक मोठ्या खर्चासाठी पैशांची गरज भासते. अशा वेळी पर्सनल लोन, गोल्ड लोन किंवा इतर कर्जप्रकार घ्यावे लागतात, पण त्यामध्ये प्रचंड व्याज, प्रोसेसिंग फी, कडक अटी आणि वेळखाऊ प्रक्रिया असते. या सगळ्याच्या तुलनेत म्युच्युअल फंडावर घेतले जाणारे कर्ज हे आर्थिक दृष्टिकोनातून अधिक फायदेशीर ठरते.

म्युच्युअल फंडावर कर्ज मिळवण्यासाठी तुम्हाला तुमचे म्युच्युअल फंड युनिट्स बँकेकडे किंवा गैर-बँकिंग वित्तीय संस्थेकडे तारण ठेवावे लागतात. या योजनेमध्ये फंड विक्री करण्याची गरज नसते, म्हणजेच गुंतवणूक सुरूच राहते आणि दरम्यान आवश्यक निधीही मिळतो. म्युच्युअल फंडावर मिळणाऱ्या कर्जाचे व्याजदर हे साधारणतः ९ टक्क्यांपासून ११ टक्क्यांपर्यंत असतात, जे पर्सनल लोनच्या तुलनेत खूपच कमी आहेत. विशेषतः या प्रकारच्या कर्जावर प्री-क्लोजिंग पेनल्टीही लागत नाही, म्हणजेच आपण वेळेआधी कर्ज फेडले तरी अतिरिक्त दंड भरावा लागत नाही.

कोणत्याही बँक किंवा वित्तीय संस्था कर्ज देताना तुमच्या म्युच्युअल फंड युनिट्सची एकूण किंमत, म्हणजेच नेट ॲसेट व्हॅल्यू तपासतात. तुम्ही ज्या फंडात गुंतवणूक केली आहे, त्याचा प्रकारही महत्त्वाचा असतो. उदाहरणार्थ, डेट फंडावर ८० टक्क्यांपर्यंत आणि इक्विटी फंडावर ५० ते ७० टक्क्यांपर्यंत कर्ज मिळू शकते. समजा तुमच्या म्युच्युअल फंडाची एकूण किंमत ५ लाख रुपये आहे, तर तुम्हाला २.५ ते ४ लाख रुपयांपर्यंत कर्ज मिळू शकते.

हे कर्ज मिळवण्यासाठी तुमचे म्युच्युअल फंड युनिट्स डिमॅट स्वरूपात असणे आवश्यक असते. त्याशिवाय तुमचे आधार, पॅन आणि बँक खाते तपशील आवश्यक असतात. या कर्जासाठी अर्ज करण्याची प्रक्रिया अतिशय सोपी आहे. अनेक बँका आणि वित्तीय संस्था ऑनलाईन पद्धतीने अर्ज स्वीकारतात. झेरोधा, ग्रो, पेटीएम मनी यासारखे फिनटेक प्लॅटफॉर्मसुद्धा ही सेवा देतात. त्याशिवाय आयसीआयसीआय, एचडीएफसी, ॲक्सिस, एसबीआय या प्रमुख बँकांकडेही ही सेवा उपलब्ध आहे.

कर्ज मिळाल्यानंतर तुम्ही ती रक्कम शिक्षण, व्यवसाय, आरोग्यसेवा किंवा घरगुती खर्च यांसह कोणत्याही वैध कारणासाठी वापरू शकता. यामध्ये कर्जाची परतफेड मासिक हप्ता स्वरूपात करता येते. विशेष बाब म्हणजे लोन घेतल्यावरही तुमच्या म्युच्युअल फंड युनिट्समधून उत्पन्न मिळत राहते. म्हणजेच, तुमची मूळ गुंतवणूक सुरूच राहते आणि त्यावरचा नफा तुमच्याच खात्यात येत राहतो.

पण यामध्ये काही गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे. जर कर्ज वेळेवर फेडण्यात अयशस्वी ठरलात, तर बँक किंवा वित्तीय संस्था तुमचे तारण ठेवलेले युनिट्स विक्री करू शकते. तसेच, बाजार घसरल्यास म्युच्युअल फंडाच्या युनिट्सची किंमत कमी होऊ शकते आणि त्यामुळे संस्था तुमच्याकडून अतिरिक्त सुरक्षा रक्कम मागू शकते. म्हणूनच अशा कर्जाचा विचार करताना आपल्या आर्थिक स्थितीचा नीट विचार करणे गरजेचे आहे. ◆◆◆

**एकंदरीत पाहता, म्युच्युअल फंडावर आधारित कर्ज ही एक आर्थिकदृष्ट्या सुरक्षित पद्धत आहे. हे कर्ज कमी व्याजदरात, जलद आणि किमान कागदपत्रांत मिळते. शिवाय, यामध्ये फंड विक्री करण्याची गरज नसल्यामुळे तुमची गुंतवणूक सुरक्षित राहते. त्यामुळे जर तुमच्याकडे म्युच्युअल फंडाचा चांगला पोर्टफोलिओ तयार झाला असेल आणि तुम्हाला तात्पुरत्या आर्थिक गरजेसाठी निधी हवा असेल, तर म्युच्युअल फंडवर कर्ज घेणे हा उत्तम पर्याय ठरू शकतो.**

## वेळेआधी कर्ज फेडणाऱ्यांना दिलासा

भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) घेतलेला नवा निर्णय देशातील कोट्यवधी कर्जदारांसाठी मोठी दिलासादायक बातमी घेऊन आला आहे. १ जानेवारी २०२६ पासून फ्लोटिंग व्याजदराच्या कर्जावर (होम लोनसह) वेळेआधी कर्जफेड (प्री-पेमेंट) केल्यास कोणतेही अतिरिक्त शुल्क किंवा दंड आकारता येणार नाही. हा निर्णय बँका आणि नॉन बँकिंग फायनान्शियल कंपन्या (एनबीएफसी) या दोघांवर लागू होणार आहे.




**प्री-पेमेंट म्हणजे काय?**

प्री-पेमेंट म्हणजे तुम्ही जेव्हा तुमचं कर्ज ठरलेल्या कालावधीच्या आधी, अंशतः किंवा पूर्णतः फेडता, तेव्हा बँका किंवा एनबीएफसी काही वेळा प्री-पेमेंट चार्जेस म्हणजेच दंड आकारतात. हे शुल्क अनेकदा कर्जदाराला कमी व्याजदराच्या पर्यायावर स्विच करू देत नाही, ज्यामुळे त्याला अधिक व्याज भरावं लागतं.

**आरबीआयने निर्णय का घेतला?**

आरबीआयच्या निरीक्षणानुसार, अनेक वित्तीय संस्था प्री-पेमेंट बाबतीत वेगवेगळी धोरणं अवलंबत होत्या. काही संस्था कर्ज करारातच अशा अटी नमूद करत असत. या अटींमुळे कर्जदाराला कमी व्याजदर असणाऱ्या अन्य पर्यायांकडे जाता येत नसे. इतर स्वस्त पर्यायांकडे जाण्यापासून अडवत. त्यामुळे ग्राहक गोंधळलेले असत आणि वाद उद्भवायचे. या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर आरबीआयने एकसंध धोरण तयार करत मोठा निर्णय घेतला आहे.

**कोणत्या प्रकारच्या कर्जदारांना फायदा होणार?**

बिगर व्यावसायिक उद्देशासाठी घेतलेले फ्लोटिंग रेट लोन घेतलेल्या व्यक्तींना लाभ.

एकट्याने किंवा को ऑब्लिगंटसह घेतलेल्या कर्जांना लागू.

सूक्ष्म व लघु उद्योजक (चडए) यांनी व्यवसायासाठी घेतलेल्या फ्लोटिंग रेट कर्जावरही सूट.

**कोणत्या संस्थांवर ही सूट लागू नाही?**

ही सवलत काही संस्थांवर लागू होणार नाही. त्यामध्ये खालील संस्था येतात:

स्मॉल फायनान्स बँक, प्रादेशिक ग्रामीण बँक , लोकल एरिया बँक, टियर-४ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक, एनबीएफसी,

**अखिल भारतीय वित्तीय संस्था**

वरील संस्थांकडून जर ५० लाखांपर्यंत कर्ज घेतलं असेल, तर त्या प्रकरणातही प्री-पेमेंट शुल्क लावता येणार नाही.

**प्री-पेमेंट च्या स्रोतावर बंधन नाही**

आरबीआयने स्पष्ट केलं आहे की कर्ज कुठल्या स्रोतांतून फेडलं जातं, यावर कोणताही परिणाम होणार नाही. म्हणजेच, पैसे स्वतःच्या जमा खात्यातून आले असोत किंवा दुसऱ्या बँकेकडून लोन ट्रान्सफर केलं असो ह कोणताही प्री-पेमेंट चार्ज आकारता येणार नाही. तसंच कोणताही लॉक-इन कालावधीही बंधनकारक राहणार नाही.

**फिक्स्ड टर्म लोन आणि ओव्हरड्राफ्टबाबत काय?**

फिक्स्ड टर्म लोनवर जर प्री-पेमेंट चार्ज लावायचाच असेल, तर तो फक्त फेडलेल्या रकमेवर आधारित असावा.


ओव्हरड्राफ्ट किंवा कॅश क्रेडिटसारख्या सुविधांमध्ये जर ग्राहकाने लवकरच रिन्यूअल न करण्याची माहिती आधीच दिली आणि कर्ज वेळेत बंद केलं, तर कोणताही शुल्क लावता येणार नाही.


आरबीआयने निर्देश दिले आहेत की, प्री-पेमेंट चार्जेस संदर्भातील सर्व अटी की फॅक्टस् स्टेटमेंटमध्ये स्पष्ट नमूद केलेल्या असाव्यात. जर घत्रड मध्ये त्या नमूद नसतील, तर नंतर त्या अटींच्या आधारे शुल्क आकारता येणार नाही. हे ग्राहकहितासाठी अत्यंत महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. ◆◆◆

**ग्राहकांसाठी काय बदलणार?**

- ✔ १ जानेवारी २०२६ पासून मंजूर किंवा रिन्यू झालेले फ्लोटिंग रेट कर्ज वेळेआधी फेडल्यास कोणताही दंड लागणार नाही.
- ✔ ग्राहकांना स्वस्त व्याजदराच्या पर्यायांकडे जाण्याचं स्वातंत्र्य मिळेल.
- ✔ बँकांकडून जबरदस्तीची अडवणूक टळेल.
- ✔ ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण व पारदर्शक व्यवहारास चालना मिळेल.

## मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्राच्या उत्पादकतेचा उच्चांक





पावसाळा असूनही जून महिन्यात मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्राची उत्पादकता वाढून १४ महिन्याच्या उच्चांकावर गेली आहे. जून महिन्यातील मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्राचा परचेसिंग मॅनेजर इंडेक्स म्हणजे पीएमआय ५८.४ इतका मोजला गेला. मे महिन्यामध्ये हा निर्देशांक ५७.६ इतका मोजला गेला होता. देशातून आणि परदेशातून या क्षेत्राला मिळालेल्या ऑर्डरमध्ये वाढ होत असून या क्षेत्रामध्ये बरीच रोजगार निर्मिती झाली असल्याचे हा निर्देशांक तयार करणार्या एचएसबीसीचे मुख्य अर्थतज्ञ प्रांजूल भंडारी यांनी सांगितले.

या क्षेत्रातने मंदीतून बाहेर पडण्याचे ठरविले असून बरीच मोठी जाहिरात मोहीम हाती घेतली आहे.त्यामुळे देशातून आणि परदेशातून ऑर्डर वाढल्या आहेत. किंबहुना जून महिन्यांमध्ये या क्षेत्रातून झालेली निर्यातही वाढली आहे. वीस वर्षात प्रथमच जून महिन्यात वाढलेल्या परदेशी ऑर्डर जास्त असल्याचे नमूद करण्यात आले. फेब्रुवारीनंतर प्रथमच कच्च्या मालाच्या किमती बर्याच कमी झाल्या आहेत. त्याचबरोबर या अगोदर वाढलेल्या किमतीनुसार मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्राने आपल्या किमतीत वाढ केली आहे. त्यामुळे या क्षेत्राचे ताळेबंद नफादायक ठरण्याची शक्यता आहे.

व्यापार युद्ध, वाढलेली स्पर्धा आणि परदेशातील महागाई इत्यादी अडथळे असूनही या क्षेत्राने जून महिन्यात उत्तम कामगिरी केली असून आगामी काळात परिस्थितीत अधिक सुधारणा होण्याची शक्यता आहे. दरम्यानच्या काळामध्ये झालेल्या व्याजदर कपातीचा या क्षेत्राला लाभ होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. देशातील ४०० कंपन्यांच्या पर्चेसिंग मॅनेजरकडून मिळविलेल्या माहितीच्या आधारावर हा निर्देशांक तयार करण्यात येतो. ◆◆◆

## प्रत्येक भारतीयावर ४.८० लाखांचे कर्ज

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या नव्या रिपोर्टने खळबळ उडाली आहे. मागील दोन वर्षात प्रत्येक भारतीयावरील भांडवली कर्जात प्रचंड वाढ झाली असून, ते ९० हजाराने वाढून ४ लाख ८० हजाराच्या घरात गेले आहे.

यावरूनच काँग्रेसने मोदी सरकारवर हल्ला चढवला. सगळे सरकारी प्रकल्प पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप किंवा खासगी भागीदारीतून होत आहेत, तर मग देशावर हे कर्ज का वाढत चालले आहे?, असा सवाल काँग्रेसने उपस्थित केला आहे.

काँग्रेसचे माध्यम प्रमुख जयराम रमेश यांनी म्हटले आहे की, मोदी सरकारने मागील ११ वर्षाच्या काळात देशाची अर्थव्यवस्था उद्ध्वस्त केली. लोकांचे आयुष्य सुधारण्याऐवजी फक्त उद्योगपती मित्रांसाठी धोरणे बनवली. त्यातून झालेले नुकसान देशातील जनतेला सोसावे लागत आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या नव्या अहवालात भारतीय अर्थव्यवस्थेबद्दल चिंता वाढवणारे चित्र समोर आले आहे.

सरकारकडून आकड्यांचा खेळ आणि तज्ज्ञांची मदत घेऊन मूळ उणीवा लपवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. पण, हे सत्य कोणीही नाकारू शकत नाही की, देशावरील कर्जाचे ओझे मोदीराजमध्ये उच्चांकी पातळीवर गेले आहे, असे रमेश यांनी म्हटले आहे.




देशात मागील २ वर्षात प्रत्येक व्यक्तीवरील कर्ज ९० हजारांनी वाढून ४.८ लाख झाले आहे. हातात येणा-या कमाईतील २५.७ टक्के पैसे फक्त कर्ज फेडण्यात चालले आहे. सर्वात जास्त ५५ टक्के कर्ज कथित क्रेडिट कार्ड, मोबाईल ईएमआय याच्यासाठी जात आहे. याचा अर्थ महागाईमुळे कुटुंबीयांचा उदरनिर्वाह होत नाही आणि कर्ज घेण्याची नामुष्की त्यांच्यावर येत आहे, असे जयराम रमेश म्हणाले. ◆◆◆

## गुंतवणूक हजाराची, परतावा कोटींचा

प्रत्येक पालकाला आपल्या मुलाच्या भविष्याची काळजी असते. त्यामुळेच ते बचत करतात, तसेच गुंतवणूक करून त्या पैशात वाढदेखील करू इच्छितात.मुलांसाठी बाजारात अनेक गुंतवणूक योजना उपलब्ध आहेत, परंतु गतवर्षी सुरू झालेली एनपीएस वात्सल्य योजना या सर्व योजनांपेक्षा अधिक फायदेशीर मानली जात आहे. या योजनेत चक्रवाढ व्याजाचा लाभ मिळतो, ज्यामुळे तुमची थोडीशी रक्कमही दीर्घकाळानंतर कोट्यवधी रुपयांचा निधी तयार



करू शकते. एनपीएस वात्सल्य योजनेअंतर्गत १८ वर्षांखालील मुलाचे खाते उघडता येते. जर तुम्ही मुलाच्या जन्मानंतर त्वरित हे खाते उघडले, तर १८ वर्षांपर्यंत हे खाते 'वात्सल्य योजना'च्या अंतर्गत राहील, आणि नंतर ते सामान्य एनपीएस खात्यात रूपांतरित होईल. तथापि, दोन्ही प्रकारच्या खात्यांवर चक्रवाढ व्याजाचा फायदा मिळत राहतो. मूल १८ वर्षांचे झाल्यावर पालक या योजनेतून बाहेर पडू शकतात. त्यानंतर अट अशी आहे की, मॅच्युरिटीवरील एकूण रकमेच्या किमान ८० टक्के रक्कम ॲन्युइटी प्लॅनमध्ये पुन्हा गुंतवावी लागेल आणि तुम्ही फक्त २० टक्के रक्कम काढू शकता.

एनपीएस वात्सल्य योजनेचा लाभ मुलाच्या उच्च शिक्षणात, व्यवसाय सुरू करण्यासाठी किंवा इतर कोणत्याही मोठ्या गरजेतही मिळणार आहे. तुम्हाला वर्षाला किमान १००० रुपयांची गुंतवणूक करावी लागेल.


जर तुम्ही मुलांसाठी एनपीएस वात्सल्यमध्ये थोडीशी रक्कमही गुंतवत राहिलात तर मुल १८ वर्षांचं होईपर्यंत तुम्ही मोठा फंड तयार करू शकता. तुम्ही यामध्ये १००० रुपयांपासूही सुरुवात करू शकता.

समजा वयाच्या १९ ते ६० व्या वर्षापर्यंत मुलानेही त्यात दरमहा १००० रुपये गुंतवले तर ६० वर्षांच्या कालावधीत एनपीएस वात्सल्य योजनेत ७.२० लाख रुपयांची गुंतवणूक होईल. पण यावर तुम्हाला जवळपास ३.७६ कोटी रुपयांचं व्याज मिळणार आहे. अशा प्रकारे तुमचा एकूण कॉर्पस ३.८३ कोटी रुपये होईल.

समजा वयाच्या ६० व्या वर्षांनंतर मुलांनी एनपीएस वात्सल्य खात्यातील सर्व पैसे ॲन्युइटी प्लॅनमध्ये गुंतवून पेन्शन घेतले असे समजूया. त्या प्लॅनमधील व्याजदर फक्त ५-६ टक्के असला तरी तुमच्या मुलांना वर्षाला फक्त १९ ते २२ लाख लाख रुपयांचे व्याज मिळेल. म्हणजेच दरमहा दोन लाख रुपये पेन्शन म्हणून मिळणार आहेत ◆◆◆

## पोलाद क्षेत्राला सवलतीची गरज

भारतातील पोलाद उद्योग आता विकसित झाला असून देशाला जेवढे पोलाद लागते तेवढे पोलाद भारतात तयार होते. मात्र काही पोलादाची विशेषतः स्टेनलेस स्टील पोलादाची अनावश्यक आयात होत आहे.ही आयात रोखून देशातील स्टेनलेस स्टील उद्योगाला सुरक्षितता देण्याची गरज असल्याचे मत जिंदाल स्टेनलेस या कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक अभ्युदय जिंदाल यांनी व्यक्त केले.



व्यापार युद्धामुळे जागतिक पातळीवर पोलादाचे उत्पादन जास्त झाले आहे. तर मागणी कमी आहे. पोलादाचे उत्पादन जास्त करणारे देश भारतामध्ये कमी किमतीवर पोलाद पाठवीत आहेत. अशा परिस्थितीत देशातील पोलाद उत्पादनांच्या किमती कमी होत आहेत. त्यामुळे देशांतर्गत पोलाद उत्पादनावर परिणाम होत असल्याचे जिंदाल यांनी इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सने आयोजित केलेल्या या विषयावरील कार्यक्रमात बोलताना सांगितले.

भारताने देशातील स्टेनलेस स्टील क्षेत्राला संरक्षण दिल्यामुळे अपराधीपणा निर्माण होण्याची गरज नाही. कारण अमेरिका आणि युरोपातील बहुतांश देश स्थानिक स्टेनलेस स्टील उत्पादकांना संरक्षण देत आहेत. भारत सरकारने त्यांचे अनुकरण करण्याची गरज असल्याचे मत जिंदाल यांनी व्यक्त केले. ते म्हणाले की, युरोप आणि अमेरिकाच नाही तर मध्य आशिया आणि कॅनडासारखे देशही स्थानिक पातळीवर पोलादाचे उतदन जास्त प्रमाणात होत नसतानाही स्थानिक उत्पादकांना संरक्षण देण्यासाठी पुढाकार घेत आहेत.

**पुरेशी उत्पादनक्षमता**

पोलाद उद्योगाने गुंतवणूक करून आपली उत्पादन क्षमता ७.५ दशल टन इतकी केलेली आहे. सध्या या उत्पादन क्षमतेचा ६० टक्के वापर होत आहे. आणखी ३० टक्के उत्पादन वाढण्यास वाव आहे. मात्र गेल्या वर्षी भारतात १७ लाख ३० हजार टन इतक्या पोलादाची आयात झाली आहे. हे पोलाद चीन, इंडोनेशिया, व्हीएतनाम, दक्षिण कोरियातून जास्त प्रमाणात येते. त्याचबरोबर अनेक देश इतर देशाच्या माध्यमातून भारतात पोलाद निर्यात करीत आहेत. ◆◆◆

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळ्याचे २७ जुलैला अनावरण


मार्केटयार्ड येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासंदर्भात कृती समिती व आंबेडकरी समाजाच्या वतीने बैठक घेण्यात आली.

नगर – अहिल्यानगर शहरातील मार्केटयार्ड येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्या संदर्भात कृती समिती व आंबेडकरी समाजाच्या वतीने बैठक घेण्यात आली. यात एक मताने निर्णय घेऊन येणाऱ्या २७ जुलैला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णकृती पुतळ्याचे अनावरण संध्याकाळी ६ वाजता होणार असल्याचे बैठकीचे अध्यक्ष विजय भांबळ यांनी व्यक्त केले.

यावेळी आमदार संग्राम जगताप, सुरेश बनसोडे, सुमेध गायकवाड, अजय साळवे, नाथा अल्हाट, किरण दाभाडे, प्रशांत गायकवाड, प्रा.जयंत गायकवाड, सुनील शिंदे, विशाल कांबळे, संजय जगताप, विशाल गायकवाड, ॲड. संदीप पाखरे, विजय गायकवाड, महेश भोसले, पोपटराव जाधव, रवींद्र कांबळे, प्रा. जाधव सर, सिद्धार्थ आढाव, कौशल गायकवाड, विशाल भिंगारदिवे, समीर भिंगारदिवे, शिवाजी भोसले, नगरसेवक विजय गव्हाळे, शिवाजी साळवे, नितीन कसबेकर, गौतमीताई भिंगारदिवे, बाळासाहेब निकम, संजय साळवे, अंकुश मोहिते, सागर ठोकळ, पप्पू पाटील, सागर विधाते, भीम वाघचौरे, सुजन भिंगारदिवे, दीपक लोंढे, सिद्धांत गायकवाड, गणेश गायकवाड, शांतवन साळवे, दया गजभिये, निखिल सूर्यवंशी, शैनेश्वर पवार, रुपेश शेलार, सुभाष वाघमारे, रुपेश लोखंडे, वैभव आवटे, बापू पाचारणे, अक्षय बोरुडे, प्रकाश वाघमारे, दीपक सरोदे, ऋषी विधाते, दीपक साळवे, येशुदास वाघमारे, प्रवीण कांबळे, ऋषी कराळे, मंगेश मोकळ, दीपक गरुड आदी उपस्थित होते.

२७ जुलै १९७८ रोजी महाराष्ट्राच्या विधिमंडळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतरांचा ठराव झाला होता त्याच दिवसाचे औचित्य साधून येणाऱ्या २७ जुलैला ऐतिहासिक विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णकृती पुतळ्याचे अनावरण होणार असल्याचे सांगितले.

# ८ आणि ९ जुलै रोजी राज्यव्यापी शाळा बंद आंदोलन

## शिक्षक भारतीचा पाठिंबा : शासनाच्या दुटप्पी धोरणाचा निषेध

नगर – अंशतः टप्पा अनुदानित शाळांना पुढील टप्प्यात संपूर्ण अनुदान मिळावे, या प्रमुख मागणीसाठी शिक्षक समन्वय संघ ८ आणि ९ जुलै रोजी राज्यव्यापी शाळा बंद आंदोलन करत आहे. या आंदोलनाला शिक्षक भारती संघटनेचा पाठिंबा असल्याची घोषणा शिक्षक भारतीचे आमदार कपिल पाटील, शिक्षक भारती संघटनेचे राज्याध्यक्ष अशोक बेलसरे, सुभाष मोरे, राज्य सचिव सुनील गाडगे यांनी केली आहे.

शिक्षण क्षेत्राच्या मागण्यांकडे वारंवार दुर्लक्ष करणाऱ्या शासनाच्या दुटप्पी धोरणाचा आम्ही तीव्र निषेध करतो. समृद्धी महामार्गासाठी हजारो कोटींची तरतूद करणाऱ्या शासनाकडे अंशतः अनुदानित शाळांच्या नियमितीकरणासाठी निधी नाही, ही शोकांतिका आहे. पावसाळी अधिवेशनात शाळांसाठी पुरवणी मागण्यांमध्ये निधीची तरतूद न करणं हे अन्यायकारक आहे. शिक्षक समन्वय संघाच्या या आंदोलनाला शिक्षक भारतीचा संपूर्ण पाठिंबा आहे, असे सुनील गाडगे यांनी ठामपणे सांगितले.

ते पुढे म्हणाले, राज्यातील लाखो शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आपल्या हक्कासाठी झगडत आहेत. शासनाने शिक्षण क्षेत्राकडे केवळ खर्चीक खातं म्हणून पाहणं थांबवावं. विद्यार्थ्यांचे भवितव्य घडवणाऱ्या शिक्षकांना योग्य सन्मान व आर्थिक सुरक्षाच मिळत नसेल, तर ते दुर्दैवी आहे. शिक्षक भारतीचे सर्व पदाधिकारी व सदस्य हे आंदोलन अधिक तीव्र करण्यासाठी शाळा बंद आंदोलनात सक्रिय सहभागी होतील.

या आंदोलनात शिक्षक भारती संघटनेचे राज्य, विभागीय, जिल्हा व तालुका पातळीवरील अनेक पदाधिकारी सहभागी होणार आहेत. या वेळी शिक्षक भारती संघटनेच्या वतीने सुनील गाडगे, जिल्हाध्यक्ष तथा माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक आप्पासाहेब जगताप, जिल्हा सचिव विजय कराळे, सोमनाथ बोंतले, जिल्हा महिला अध्यक्ष आशा मगर, कार्यवाह संजय भुसारी, कैलास जाधव, योगेश हराळे, नवनाथ घोरपडे, सचिन शेलार, गोरक्षनाथ गव्हाणे, उर्दू जिल्हाध्यक्ष मोहंमद समी शेख, उच्च माध्यमिक जिल्हाध्यक्ष रामराव काळे, पुणे विभागीय कार्याध्यक्ष तथा शिक्षक भरतीचे जिल्हा सचिव महेश पाडेकर, संभाजी पवार, हनुमंत रायकर, सिकंदर शेख, संजय पवार, संतोष देशमुख, किसन सोनवने, संतोष शेंदुरकर, संभाजी चौधरी, श्रीकांत गाडगे, रेवण घंगाळे, जॉन सोनवणे, महिला जिल्हाध्यक्ष आशा मगर, सचिव विभावरी रोकडे, कार्याध्यक्ष मीनाक्षी सूर्यवंशी, रोहिणी भोर, शकुंतला वाळुज, छाया लष्करे, जया गागरे, अनघा सासवडकर, रूपाली बोरुडे, सोनाली अकोलकर, विनाअनुदानितच्या राज्यअध्यक्षा रूपाली कुरूमकर आदी पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

शिक्षण क्षेत्राशी संबंधित सर्व संघटनांनी एकत्र येऊन सरकारच्या उदासीनतेला तोंड द्यावे आणि शिक्षण हक्कासाठी निर्धाराने उभे राहावे, असे आवाहन शिक्षक भारतीने या निमित्ताने केले आहे.

# कल्याण रोडवर प्राध्यापकाच्या घरातून लाखोंच्या ऐवजाची चोरी

नगर – शहरात प्राध्यापकाच्या बंद घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने लाखोंच्या ऐवज चोरुन नेला. ही घटना कल्याण रोड वरील शिवाजी नगर येथे ६ जुलै रोजी सायंकाळी उघडकीस आली आहे.

या बाबत प्राध्यापक अविनाश मच्छिंद्र हंडाळ (वय ३६, रा. शिवाजीनगर कल्याण रोड, मूळ रा. भातकुडगाव ता. शेवगाव) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे छत्रपती अभियांत्रिकी महाविद्यालयात प्राध्यापक असून त्यांची पत्नी स्वाती हंडाळ या देखील पेमराज सारडा महाविद्यालयात प्राध्यापक आहेत. फिर्यादी यांची पत्नी माहेरी भातकुडगाव येथे गेलेली होती. ४ जुलै रोजी फिर्यादी यांचा मुलगा आजारी असल्याने फिर्यादी हे त्यांच्या मूळगावी भातकुडगाव येथे गेले होते. तेव्हा त्यांनी घर व्यवस्थित लॉक केलेले होते. मात्र ६ जुलै रोजी सायंकाळी शेजाऱ्याचा फोन आला व त्यांनी तुमच्या घराचा दरवाजा उघडा असल्याचे सांगितले. ही माहिती मिळाल्यावर ते तात्काळ नगरला परत आले. घरात आल्यानंतर पाहणी केली असता, मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून चोरट्यांनी कपाटातील कपडे आणि साहित्य अस्ताव्यस्त केले होते. घरातील कपाटातील १ लाख ६० हजारांची रोख रक्कम आणि २ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने असा ऐवज घरातून चोरीस गेला असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

त्यानंतर त्यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात जावून फिर्याद दिली. या फिर्यादीवरुन पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध बी एन एस कलम ३३१(१) (४), ३०५ (अ ) प्रमाणे घरफोडीचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दळवी हे करीत आहेत.

# विद्यार्थी व पालकांचे सुरु असलेले आंदोलन अखेर स्थगित

## सकारात्मक आश्वासन; पालक संघ समितीच्या आंदोलनाला यश

नगर – कापड बाजार येथील लक्ष्मीभाऊराव पाटील प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापकाची बदली रद्द होण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांसह पालकांचे रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभाग कार्यालयात सुरु असलेले आंदोलन संस्थेच्या वतीने देण्यात आलेल्या ठोस आश्वासनाने मागे घेण्यात आले.

नुकतीच शाळा सुरु होऊन काही दिवस उलटले असताना मुख्याध्यापक शिवाजी लंके यांची अचानक बदलीचा आदेश आल्याने विद्यार्थ्यांसह पालकांनी पालक संघ समितीच्या माध्यमातून १ जुलैपासून बुरुडगाव रोड येथील संस्थेच्या उत्तर विभाग कार्यालयाच्या आवारात आंदोलन सुरु केले होते. विद्यार्थी व पालकांनी शाळेवर देखील बहिष्कार टाकल्याने शाळा विद्यार्थ्यांशिवाय भरत होती. सलग तीन दिवस झालेल्या या आंदोलानवर ५ जुलै रोजी तोडगा काढून आंदोलन मागे घेण्यात आले. संस्थेच्या वरिष्ठ पातळीवरुन सदर आंदोलनाची दखल घेऊन यावर सकारात्मक आश्वासन देण्यात आल्याने सदरचे आंदोलन स्थगित करण्यात आले असल्याची माहिती पालक संघ समितीच्या वतीने देण्यात आली आहे. विद्यार्थी व पालकांनी केलेल्या आंदोलनाला अखेर यश आले आहे.

# महिलेस मारहाण करत गळ्यातील मंगळसूत्र लांबविले

## मिस्कीन मळा रस्त्यावरील घटना, गुन्हा दाखल

नगर – आषाढी एकादशीच्या उपवासासाठी लागणारा किराणा सामान घेऊन घरी परतणार्या सेवानिवृत्त महिला कर्मचार्याला धक्का देत मारहाण करत त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून चोरटे पसार झाल्याची घटना सावेडी उपनगरातील मिस्कीन मळा रस्त्यावरील हिरा मोती पान शॉपजवळ ५ जुलै रोजी रात्री घडली. या प्रकरणी देवयानी रामसिंग रघुवंशी (वय ५७, रा. क्रांती चौक, सिव्हील हाडको, अहिल्यानगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रघुवंशी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार त्या जिल्हाधिकारी कार्यालयात वरिष्ठ लिपिक पदावर कार्यरत होत्या आणि सध्या निवृत्त आहेत. त्या एकट्याच राहत असून निवृत्ती वेतनातूनच उदरनिर्वाह करतात. शनिवारी रात्री ८.३० च्या सुमारास त्या आषाढी एकादशीच्या उपवासासाठी लागणारा किराणा घेण्यासाठी मिस्कीन मळा रस्त्यावरील प्रकाश प्रोव्हिजन स्टोअर्स येथे गेल्या होत्या.

८.४५ वाजता त्या घरी परतत असताना हिरा मोती पान शॉपजवळ त्या पोहोचल्या असता अचानक दुचाकीवरून दोन अज्ञात इसम त्यांच्या समोर आले. दुचाकीच्या मागील सीटवर बसलेल्या व्यक्तीने रघुवंशी यांना धक्का देत हाताने मारहाण केली व त्यांच्या गळ्यातील अंदाजे ३० हजार रूपये किमतीचे १४ ग्रॅम वजनाचे काळ्या मण्याचे सोन्याचे चैन मंगळसूत्र जबरदस्तीने खेचून तोडले. त्यानंतर चोरटे दुचाकीवरून तात्काळ पसार झाले.

दरम्यान, दुचाकीवर मागे बसलेला इसम अंदाजे ३० ते ३५ वर्षे वयाचा व अंगात लाल रंगाचे जर्किन व तोंडावर रूमाल बांधलेला होता. पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरूध्द जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास उपनिरीक्षक दळवी करीत आहेत.

# हिना मुनोत सीए फायनल परीक्षा उत्तीर्ण

नगर – सीए. फायनल परिक्षेत कु. हिना मुनोत उत्तीर्ण झाली आहे.



तिला तिचे काका सीए शांतीलाल अमोलकचंद मुनोत, सीए रिषभ संजय कटारिया (एस्. ए. मुनोत ॲण्ड कं) तसेच देसर्डा भंडारी ॲकॅडमीचे सीए संदीप देसर्डा, सीए प्रसाद भंडारी यांचे मार्गदर्शन लाभले.

अहिल्यानगर येथील राजेंद्र अमोलकचंद मुनोत यांची कन्या आहे.

# रूषभ मुथा सी.ए. फायनल परीक्षा उत्तीर्ण

नगर – मे २०२५ मध्ये झालेल्या सीए. फायनल परिक्षेत रुषभ रुपाली राजेश मुथा उत्तीर्ण झाला आहे.



अमृत किराणा स्टोअरच्या संचालिका रुपाली राजेश मुथा यांचे चिरंजीव, दि अन्नपूर्णा फूड ॲण्ड इव्हेंटस चे संचालक महेंद्र (बाळूशेठ) गुगळे व ॲड. गौतम गुगळे (नोटरी पब्लिक) यांचा भाचा आहे. सीए. रुषभ हे एच.एम. काळे ॲण्ड असोसिएट मध्ये कार्यरत असून त्याला सीए. राजेश शहा यांचे मार्गदर्शन लाभले.

# कामाचे पैसे मागितल्याने पती पत्नीस तिघांकडून शिवीगाळ करत मारहाण

नगर – हॉटेलमध्ये काम करणाऱ्या पती–पत्नीने कामाचे पैसे मागितल्याचा राग आल्याने हॉटेल मालकासह दोघांनी पती–पत्नीस शिवीगाळ दमदाटी करीत लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केली. ही घटना नगर दौंड रोडवरील अरणगाव येथील भारत पेट्रोल पंपाजवळ ५ जुलै रोजी घडली.

याबाबत विमल जालिंदर क्षेत्रे (वय ४०, रा एमआयडीसी गजानन कॉलनी,अ.नगर. हल्ली रा. चिखली ता. श्रीगोंदा अ.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की फिर्यादी या त्यांचे पती जालिंदर क्षेत्रे यांच्यासह गणेश झेंडे यांच्या हॉटेल निसर्ग येथे काम करतात. ५ जुलै रोजी फिर्यादी व त्यांचे पती यांनी हॉटेल मालक गणेश झेंडे यांना हॉटेलमधील कामाचे पैसे मागितले, याचा राग आल्याने गणेश झेंडे, हॉटेलमधील वेटर सागर (पूर्ण नाव माहित नाही) गणेश झेंडे यांचा मित्र (पूर्ण नाव पत्ता माहीत नाही) यांनी शिवीगाळ करुन फिर्यादी व त्यांच्या पतीस लाथा बुक्क्यानी व लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केली. या मारहाणीत फिर्यादी व त्यांचे पती जखमी झाले.

याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात विमल क्षेत्रे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तिघांविरुद्ध मारहाणीचा गुन्हा दाखल केला. पुढील तपास महिला पोलीस नाईक काळे या करीत आहेत.

# सुगंधित तंबाखू, गुटख्याची वाहतूक करणारी टोळी पकडली

## ५ लाख ५४ हजारांचा मुद्देमाल जप्त, विशेष पथकाची कारवाई

नगर – सुगंधित तंबाखू व गुटख्याची वाहतूक करणार्या टोळीवर पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या विशेष पथकाने कारवाई करत ५ लाख ५४ हजार ८८५ रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यामध्ये सुगंधीत तंबाखू, गुटखा, पानमसाला आणि एक चारचाकी वाहनाचा समावेश आहे. तिघा संशयित आरोपींना ताब्यात घेतले आहे.


सुगंधित तंबाखू, गुटख्याची वाहतूक करणारी टोळी पकडल्यानंतर मुद्देमालासमवेत पोलिस अधिक्षकांचे विशेष पथक.

अधीक्षक घार्गे यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर कारवाई करण्यासाठी विशेष पथकाची स्थापना केली आहे. त्यानुसार, परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक संतोष खाडे यांच्या नेतृत्वाखाली ५ जुलै रोजी कर्जत पोलीस ठाणे हद्दीत गस्ती दरम्यान ही कारवाई करण्यात आली. राशिन–भिगवण रस्त्यावरून कारमधून गुटखा वाहून नेला जात आहे, अशी माहिती पथकाला मिळाली होती.

माहिती मिळताच तातडीने सापळा रचण्यात आला. संशयित वाहन थांबवून तपासणी केली असता त्यामध्ये सुगंधीत तंबाखू, गुटखा व पानमसाल्याचे गोणी व बॉक्स आढळून आले.

संभाजी शिवाजी सरक (वय ३५, रा. मदनवाडी, भिगवण, ता. इंदापूर, जि. पुणे), अमर अनिल कांबळे (वय ३५, रा. आंबेडकर नगर, राशिन, ता. कर्जत) व भाऊसाहेब किसन सकुंडे (वय २७, रा. मदनवाडी, भिगवण, ता. इंदापूर, जि. पुणे) यांना ताब्यात घेत कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

सदरची कामगिरी अधीक्षक घार्गे, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे व वैभव कलुबर्मे, पोलीस उपअधीक्षक सुनील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक खाडे यांच्या पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली आहे. पुढील तपास कर्जत पोलीस करीत आहेत.

# हॉर्न वाजवल्याच्या कारणावरुन दोघांना मारहाण

नगर – घरासमोर हॉर्न वाजवल्याच्या कारणावरुन विष्णू गायकवाड व रोहन मोरे (रा. वाळवणे) यांना शिवीगाळ धमकी देत लाथाबुक्क्यांनी व लोखंडी कोयत्याने मारहाण केल्याची घटना नगर तालुक्यातील बाबुर्डी घुमट येथील ६ जुलै रोजी सकाळी घडली.

याप्रकरणी नगर तालुका पोलिसांनी विशाल अण्णा गायकवाड (वय ३०, रा. बाबुर्डी घुमट, ता.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन संजय कल्लाप्पा मोरे, भैरव लक्ष्मण मोरे, मारुती कलाप्पा मोरे, अनिल लक्ष्मण मोरे, कल्लप्पा भीमा मोरे, अशोक भीमा मोरे, आकाश अशोक मोरे, लक्ष्मण भीमा मोरे. (सर्व रा. बाबुर्डी घुमट ता. नगर) यांच्याविरुद्ध मारहाणीचा गुन्हा दाखल केला आहे.


सारडा महाविद्यालयाची विद्यार्थिनी स्नेहल पिपाडा सी.ए. परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल तिचे अभिनंदन करताना उपप्राचार्य प्रा.गिरीश पाखरे, पर्यवेक्षक डॉ.राजू रिक्कल, पर्यवेक्षक डॉ. सुजीत कुमावत, रजिस्ट्रार अशोक असेरी आदी.

# सारडा महाविद्यालयाची विद्यार्थिनी स्नेहल पिपाडा सी.ए. परीक्षा उत्तीर्ण

नगर – हिंद सेवा मंडळाच्या पेमराज सारडा महाविद्यालयाची विद्यार्थी स्नेहल पिपाडा सी.ए.परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला. सी. ए. परिक्षेची तयारी करताना केवळ अभ्यासच न करता महाराष्ट्रातील विविध वक्तृत्व व वाद विवाद स्पर्धेत स्नेहल पिपाडाने महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करून बक्षीसे प्राप्त केलेले आहेत.

या प्रसंगी महाविद्यालाचे उपप्राचार्य प्रा.गिरीश पाखरे, पर्यवेक्षक डॉ.राजू रिक्कल, पर्यवेक्षक डॉ. सुजीत कुमावत, रजिस्ट्रार अशोक असेरी, प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते. हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, कार्याध्यक्ष डॉ. रमेश झरकर, मानद सचिव संजय जोशी, ज्युनिअर कॉलेज कमिटी चेअरमन डॉ.पारस कोठारी यांनी स्नेहलला शुभेच्छा दिल्या आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# हद्दपारी आदेशाचा भंग करून शहरात येवून मोहरम मिरवणुकीत फिरणाऱ्या तिघांना पकडले

नगर – हद्दपार आदेशाचा भंग करून शहरात प्रवेश करत मोहरम मिरवणुकीत फिरणाऱ्या तिघांना पोलिसांनी पकडले आहे. यातील दोघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तर एकाला कोतवाली पोलिसांनी पकडले असून त्यांच्या विरुद्ध हद्दपारी आदेशाचा भंग केल्या प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.


हद्दपारी आदेशाचा भंग करून शहरात आलेल्या दोघा आरोपींना पकडल्यानंतर त्यांच्यासमवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस मोहरमच्या पार्श्वभूमीवर नगर शहरात गस्त घालत असताना दोघा हद्दपार गुन्हेगारांना ताब्यात घेत त्यांच्याविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल केले. सलमान मेहबूब खान (वय ३१, रा. कोठला, घासगल्ली) याला दोन वर्षांच्या कालावधीसाठी उपविभागीय दंडाधिकारी, अ. नगर यांच्या आदेशाने जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आलेले आहे. मात्र, तो परवानगीशिवाय गुलशन डेअरीजवळ, कोठला परिसरात फिरत असल्याचे आढळले. पोलिसांनी त्याचा पाठलाग करुन त्यास ताब्यात घेतले.

दुसक्षयया कारवाईत असद गफार शेख (वय ३५, रा. मुकुंदनगर, दर्गा दायरा रस्ता) यास ६ महिन्यांसाठी जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले होते. मात्र तो विनापरवाना राज चेंबरजवळ, कोठला स्टँड परिसरात फिरताना आढळून आला. त्यालाही ताब्यात घेऊन गुन्हा नोंदविण्यात आला. या दोन्ही प्रकारांमध्ये संशयित आरोपींनी महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ चा भंग केला आहे.

कोतवाली पोलिसांनी अमन युनूस शेख (वय २१, आशा टॉकीज जवळ, अ.नगर) यास विना नंबरची मोटारसायकल भरधाव वेगात व धोकादायकपणे चालवताना मिळून आल्याने त्याचा पाठलाग करुन त्यास पकडले. ही कारवाई तख्ती दरवाजा येथे केली. उपविभागीय अधिकारी (नगर भाग) यांनी ५ जुलै रात्री बारा ते ६ जुलै रात्री बारा वाजलेच्या दरम्यान कोतवाली पोलीस ठाणे हद्दीत प्रवेश करु नये असा आदेश बजावलेला असताना त्याने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३(२) चे आदेशाचा भंग करुन शहरात प्रवेश केला याप्रकरणी पोलीस ठाण्यात अमन शेख याच्याविरुद्ध बी एन एस कलम २२३,२८१ प्रमाणे गुन्हा दाखल केला.


माउंट लिटेरा झी स्कूल अरणगावच्या मानसी देशमुखचा प्रो. शैलजा लोटके मॅडम यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

# माउंट लिटेरा झी स्कूलमधील विद्यार्थिनी मानसी देशमुखला अमरावतीत रौप्य पदक

नगर – फर्स्ट अचिव्हर ॲकॅडमी, अमरावती यांच्यावतीने आयोजित फेडरेशन मॅच स्पर्धेमध्ये माउंट लिटेरा झी स्कूल, दौंड रोड, अरणगाव, अ.नगर येथील विद्यार्थीनी मानसी अनिल देशमुख हिने कनिष्ठ गट, ४४ किलो वजनी गट, वय १५ ते १७ वर्षे या गटात उत्कृष्ट कामगिरी करत रौप्य पदक पटकावले. ही स्पर्धा अमरावती, महाराष्ट्र येथे पार पडली. मानसीच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शाळेच्या प्राचार्य प्रो. शैलजा लोटके मॅडम यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

शाळेचे व्यवस्थापन, शिक्षक, पालक वर्ग आणि विद्यार्थी यांनी मानसीचे मन:पूर्वक अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

